विषय
सं. क्र.
REFBK-0001872

श्रीगंगारघूवीर प्रसन्न.

# श्री नाशिक पंचवटी क्षेत्र वर्णन.

(श्रीराममंदिराचे चित्रासह)

कै० गोपाळ बाळकृष्ण वैद्य पेन्शनर मास्तर
यांनीं तयार केलें तें
सुधारून
शिवराम गोपाळ वैद्य यांनीं

मुंबईत
आयुर्वेद छा. छापिलें.
सन १९२०

REFBK-0001872
REFBK-0001872

द्वा ... नी.
कांदेवाडी, मुंबई. नं. ४.

किंमत ६ आणे.

## अर्पण पत्रिका.

या पुस्तकाची मूळ प्रत आमचे वडील कै. गोपाळ बाळकृष्ण वैद्य यांनीं तयार केली होती. त्यांचा लवकरच काल झाल्यानें प्रत छापण्याचें काम तसेंच राहिलें. तें त्यांच्या इच्छेप्रमाणें फार दिवसांनीं कां होईना पण आज पुरें करून त्यांसच सप्रेम समर्पण करण्यांत येत आहे.

प्रकाशक--शिवराम गोपाळ वैद्य.


कै. गोपाळ बाळकृष्ण वैद्य यांनीं केलेलें

**श्रीत्र्यंबकक्षेत्र वर्णन.**

छापत आहे.

किंमत ६ आणे.

---

एस्. बी. कल्याणकर एन्ड सन्स.

# सुगंधी.


सर्व प्रकारचीं अत्तरें, तेलें, वगैरे तयार करणार व विकणार.

शिवाय

सावंतवाडी येथील सर्व प्रकारचें लांकडी रंगीत सामान घाऊक व किरकोळ मिळेल. बाहेरगांवीं माल व्ही. पी. नें पाठवूं.

पत्ता:—ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २.

श्री काळ्यारामाचें मंदिर. नासिक पंचवटी.



: प्रि. प्रेस, मुंबई. फोटोग्राफर–वीरकर. नाशि

# नाशिक पंचवटी महात्म्य.

## भाग १ ला.

### [ पौराणिक कथांचें सार. ]

चार युगांपूर्वी नाशिक पंचवटी हीं नावें नव्हतीं, तशी गोदावरी नदीहि नव्हती. त्यावेळीं या भूमीस हरीहर क्षेत्र ह्मणत असत पुढें यास सुंदरपूर ह्मणूं लागले. नंतर गौतमानीं गोदावरी नदी आणली, ती त्र्यंबकेश्वरावरून या सुंदरपुरावरून वाहत जाऊन समुद्रास मिळाली. पुढें हर ( शंकर ) ज्या भूमींत राहिले त्या भूमीस पंचवटी व हरी ( विष्णु ) ज्या भूमींत राहिले त्यास युगायुगांत निरनिराळीं नांवें असून कलियुगांत नाशिक हें नांव चालू आहे. यांचीं कारणें पुढें संक्षेप रुपानें दिलीं आहेत.

हर ( शंकर ) ह्यांचे मागें ब्रह्महत्या लागली होती, ती नाहींशी व्हावी ह्मणून ते पृथ्वीवर हिंडत होते. एके दिवशीं रात्रीं ते नाशिकाजवळ गोवर्धन गांवीं मुक्कामास असतां त्यांनीं रात्रीं तेथें बैल व गाय यांचा संवाद ऐकिला. "त्यांत जवळच रामतीर्थ ( रामकुंड ) आहे, त्यांत आनंदघन व अस्थीविलय हीं दोन तीर्थें आहेत; त्यांपैकीं अस्थिविलय तीर्थांत स्नान केलें असतां ब्रह्महत्त्या नाहींशी होते." तें बैलाचें भाषण ऐकून दुसरे दिवशीं शंकरानीं अस्थिविलय तीर्थांत स्नान केलें. तेव्हां त्यांची ब्रह्महत्त्या गेली. ह्मणून ते तेथें राहिले व त्यांनीं बैलास गुरु मानिला. ह्मणून ह्याठिकाणी त्यांच्यापुढें नंदी नाहीं. हर ह्यांस येथें कपालेश्वर ह्मणतात.

हरी ( विष्णु ) ह्यांस जालंदर राक्षसाची स्त्री वृंदा हिनें शाप दिला होता, त्यानें त्यांची काया गौर असतां कृष्णवर्ण झाली. ती काया ह्या ठिकाणीं बद्रिकाश्रम तीर्थ आहे, त्यांत स्नान केल्यानें पूर्ववत गौर झाली ह्मणून ते तेथेंच राहिले, तेव्हां ह्या भूमीस हरिहर क्षेत्र ह्मणूं लागले.

पुढें हे दोन देव येथें राहिले ह्मणून सर्व देव येथें येऊन राहिले तेव्हां ह्या भूमीस सुंदरपूर ह्मणूं लागले.

पुढें गौतमानें गोदावरी आणिली ती ह्या सुंदरपूरांतून वाहत गेली. नंतर कालांतरानें कपालेश्वर ज्या भूमीत राहिले त्या भागास पंचवटी नांव पडलें. ह्याचें कारण–या स्थळीं ऋषीपुत्र पांच बटु ( ब्रह्मचारी ) रहात असून त्यांस कांहीं कारणानें सूर्याचा

शाप होऊन ते पांच वट्ट पांच वडाचे वृक्ष झाले त्यावरून त्या क्षेत्रास पंचवटी असें नांव चालू झालें.

हरी ( विष्णू ) गोदावरीच्या दक्षिण तीरास होते त्या भूमीस युगायुगांत निरनिराळीं नांवें पडलीं तीं:—

**कृते तु पद्मनगरं । त्रेतायां तु त्रिकंटकम ॥**
**द्वापारे च जनस्थानं । कलौ नाशिकमुच्यते ॥ १ ॥**

अर्थ—कृतयुगांत पद्मनगर, त्रेतायुगांत त्रिकंटक, द्वापारयुगांत जनस्थान व कलियुगांत नाशिक. अशीं नांवें पद्मपुराणांत सिंहस्थ महात्म्यांत सांगितलीं आहेत. यांत नाशिक हें नांव पडण्याचें कारण असें समजतें कीं, रामावतारीं रामांनीं लक्ष्मणाकडून शूर्पणखेचें नाक कापविलें. पुढें रामांनीं तिचा भाऊ रावण त्यास मारून त्यास मुक्ति दिली. हें पाहून शूर्पणखा रामास शरण येऊन ह्मणाली कीं, " मला मुक्ति द्या व माझें नांव चिरकाल राहील असें करा. " तेव्हां ते दयाघन कृपाळु राम त्यांनीं तिला मुक्ति दिली, व त्या भूमीस हल्लीं जनस्थान ह्मणत आहेत, पुढें त्या भूमीचे ठिकाणीं तुझा नाशिका छेद केला आहे ह्मणून हीस कलियुगांत नाशिक ह्मणतील. त्यावरून कलियुगांत नाशिक हें नांव चालू झालें आहे. रामवतारीं यास रामक्षेत्रही ह्मणत असत. भगीरथ राजानें स्वर्गाहून भागिरथी आणिली. त्यापूर्वी गौतमानें गोदावरी आणिली. ह्मणून हिला वृद्ध गोदा असें ह्मणतात. हिचें व हिच्या कांठच्या ठिकाणांचें महात्म्य भागिरथीपेक्षां मोठें वर्णिलें आहे.

ब्रह्मांड पुराणांत—**नाशिकं च प्रयागं च । पुष्करं नैमिषं तथा ॥ पंचमं तु गयाक्षेत्रं । षष्ठं क्षेत्रं न विद्यते ॥**

नाशिक व पंचवटी महात्म्यें निरनिराळीं आहेत. तरी तीं बहुतेक साम्य आहेत. त्यांत पंचवटीचें महात्म्य थोडें अधिक वर्णिलेलें आहे ह्मणून पंचवटीच्या महात्म्याचें सार ह्यांत दिलें आहे. त्यावरून नाशिकचें महात्म्य लक्षांत येईल.

महामुनी मार्कंडेय ऋषि व्यासांचे शिष्य जैमिनी यांनीं असा प्रश्न केला महाराज कलियुगाचेठायीं सर्व पृथ्वीमध्यें लोक धर्मभ्रष्ट होतील; नानाप्रकारचे दुरा[illegible] व धर्मभ्रष्ट लोकांची सत्ता चोहोंकडे चालेल; राजे दुष्ट व म्लेन्छ धर्माचे होतील; अशा वेळीं वर्णाश्रम धर्म अगदीं नाहींसा होऊन जिकडे तिकडे संकर होईल. तेव्हां असल्या घोर कलिकालांत धर्मानुरोधानें वर्तन करणाऱ्या द्विज जातीनें कोठें रहावें ? कीं, ज्या ठिकाणीं राहिलें असतां अधर्माची बाधा होणार नाहीं ? मार्कंडेय सांगतात, हे लोकहितचिंतक जैमिने ऐक. कलियुगांत सर्व देवता आणि तीर्थें हीं स्वर्गीं स्वस्थानीं

जाणार. या पृथ्वीवर धर्म भ्रष्ट होऊन मुमुक्षुजनांस उद्धरून जाण्यास श्रीरामनामाचें सेवन हाच काय तो मार्ग उरणार आहे. ह्यास्तव हा भवसागर तरून जाण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं ह्या पंचवटींत श्रीरामचंद्राच्या संनिध राहून त्यांच्या चरणकमलांची निरंतर सेवा करावी. काशीमध्यें जो मृत्यु पावेल त्याला विश्वनाथांनीं मुक्ति सांगितली आहे, परंतु पंचवटींत तर निमिषमात्र राहणारास श्रीरामचंद्रानीं मुक्ति सांगितली असून कलियुगांत पंचवटीसारखी भवाब्धि तरून जाण्यास दुसरी नौका नाहीं, असें कथन केलें आहे. कलियुगाचे धर्म सर्व ठिकाणीं बाधतात; परंतु त्यांची बाधा गोदावरीचे काठीं होत नाहीं. अरुणा, वरुणा, सरस्वती ह्यांच्या मध्यभागीं गोदावरीच्या काठीं जो पंचवटी प्रदेश आहे, तो अतिशय पुण्यकारक व या लोकीं मुक्ति देणारा आहे. प्रत्यक्ष शंकरांनीं पंचवटीसारखें पुण्यक्षेत्र त्रैलोक्यांत नाहीं, असें इंद्रादिदेवांस सांगितलें आहे. या पवित्र स्थळीं गोदावरीचें स्नान केलें असतां ब्रह्महत्येचें पाप नाहींसें होतें. तसेंच याठायीं देहविसर्जन झाला असतां तो प्राणी उद्धरून देवलोकीं जातो. परम कृपाळु श्रीरामचंद्र हे नित्य पंचवटींत वास करीत आहेत. काशीमध्यें विश्वनाथाचें नाम जसें तारक आहे, तसें पंचवटींत श्रीरामनाम तारक आहे, पंचवटींत जे कोणी वास करितात; ब्राह्मणांचें पूजन व संतर्पण करितात; यज्ञयागादि करितात; ते उद्धरतात. अगोदर मनुष्य जन्म दुर्लभ, त्यांतही ब्राह्मण जन्म महत् दुर्लभ असून पंचवटीवास व श्रीरामपाद सेवन, हीं तर परम दुर्लभ, असें प्राप्त झाल्यावर मोक्ष सन्निधच आहे.

रामतीर्थांत ( अस्थिविलयांत ) स्नान केलें असतां ब्रह्महत्येचें पाप नाहींसें होतें, त्यांत मृत मनुष्याच्या अस्थि टाकिल्या असतां त्यांचें पाणी होतें. ह्या प्रकारें या तीर्थाचा महिमा सांगितला आहे.

रामगया—रामगयेवर पितरांस पिंड देणारे पितरांसह उद्धरून मुक्ति पावतात, या स्थानीं गोप्रदानाचें विशेष महात्म्य वर्णिलें आहे. ब्रह्मा विष्णु महेशांसह सर्व सुरगण हेही रामगयेवर स्नानदानें करून शुची झाले आहेत. येणेंप्रमाणें पद्मपुराणांतर्गत महात्म्याचें वर्णन दिलें आहे.

तीर्थे—गोदावरी श्री त्र्यंबकेश्वरापासून निघाली ती नाशिक पंचवटी क्षेत्रावरून राजमहेंद्रीकडे वहात जाऊन समुद्रास मिळाली आहे. हिच्यांत पुष्कळ तीर्थें आहेत त्यांपैकीं नाशिक पंचवटी क्षेत्राचे हद्दींत जीं तीर्थें आलीं आहेत तीः—

[ १ ] अग्नितीर्थ राजेबहादर यांचे घाटाचे वरचे अंगास गंगेंत आहे. [ २ ] इंद्रकाश्यपतीर्थ- सुंदर नारायणाचे देवालयापुढें गंगेंत आहे. [ ३ ] दत्ततीर्थ-दत्ताचे

देवालयापुढें गंगेंत आहे. [ ४ ] ऋणतीर्थ—दत्त तीर्थापासून लक्ष्मणकुंडा ( तीर्था ) पर्यंत. हल्लीं ह्यास तास ह्मणतात. [ ५ ] लक्ष्मण तीर्थ—लक्ष्मण कुंडांत. [ ६ ] अस्थिविलय तीर्थ—रामकुंडांत ह्यांत अस्थिचें पाणी होतें. [ ७ ] आनंदघन तीर्थ—रामकुंडांत, अरुणा नदी मिळाली आहे तेथें आहे. [ ८ ] सीता तीर्थ—सीताकुंडांत. [ ९ ] नाग तीर्थ-पांची देवळांचे उत्तर बाजूस. [ १० [ सूर्य तीर्थ—पांची देवळांचे आग्नेय कोपऱ्यास. [ ११ ] दशाश्वमेध तीर्थ—निळकंठेश्वराचे देवालयापुढें चांदवडकरांचे सांडव्याच्या उत्तर बाजूस, येथें श्रीरामचंद्रांनीं आपल्या वडिलांचें ( दशरथ राजाचें ) पिंडदान केलें. [ १२ ] मुक्तेश्वर तीर्थ—मुक्तेश्वर महादेवापुढें गंगेंत आहे. वरुणा, सरस्वती, गायत्री, सावित्री ह्यांचे संगम जे गंगेसी होतात, तेथें तींच तीर्थें आहेत. इंद्रकुंड—पंचवटींत अरुणेच्या कांठीं आहे

तपोवनः— पंचवटीच्या पूर्व अंगास पाऊण मैलावर गंगा किनाऱ्यास रमणीय स्थान आहे त्या ठिकाणीं लक्ष्मणांनीं श्रीरामाची सेवा करून तपश्चर्या केली ह्मणून त्यास तपोवन ह्मणतात. येथें लक्ष्मणाची मूर्ति एका वडाचे झाडाखालीं लहानशा देवालयांत आहे. येथें जें अग्नितीर्थ आहे, त्याविषयीं अध्यात्म रामायणांत अध्याय ७ श्लोक ११२ यांत सांगितलें आहे. तेंः—

**अथ रामोऽपि तत्सर्वं ज्ञात्वा रावण चेष्टितम् ॥**
**उवाच सीतामेकान्ते शृणु जानकि मे वचः ॥**
**रावणो भिक्षुरूपेण आगमिष्यति तेंतिकम् ॥**
**त्वं तु छाया तदाकारा स्थापयित्वोटजे विश ॥**
**अग्नावदृष्यरुपेण वर्षं तिष्ठ ममाज्ञया ॥**

यांत सांगितल्याप्रमाणें सीतेनें आपला देह अग्निकुंडांत ठेवून रावण भिक्षा मागण्यास आल्यावर त्याला भिक्षा घालण्यास गेली, तेव्हां रावणानें तिला उचलून घेऊन लंकेस नेलें.

या तपोवनांत पुष्कळ तीर्थें आहेत. तीं:— ब्रह्मयोनि, रुद्रयोनि, त्रि० मुक्ति तीर्थ, अग्निकुंड, कुंकुमतीर्थ, कज्जलतीर्थ, सौभाग्य तीर्थ, कपिला नदी मिळते तेथें कपिला तीर्थ, लक्ष्मणांनीं शूर्पणखेचें नाक व कान छेदिले त्या तिची खडकावर प्रतिमा उमटलेली आहे. त्याजवळ शूर्पणखातीर्थहि अ पश्चिम अंगास सप्तऋषि कोठड्या आहेत.

पंचवटीपासून तपोवनापर्यंत मार्गांत व तपोवनांत बैरागी मोठीं देवालयें बांधून त्यांत ते 'सीताराम' नाम स्मरणी आपला क

# भाग २ रा.

## प्राचीन माहिती.

चारही युगांत नाशिक क्षेत्र हें निरनिराळ्या नांवांनीं प्रसिद्ध आहे. कृत व द्वापार ह्या युगांतील ह्या क्षेत्रासंबंधींच्या गोष्टी उपलब्ध नाहींत. त्रेतायुगांत या क्षेत्रीं जनक राजानें पुष्कळ यज्ञ केले ह्मणून यास जनस्थान ह्मणूं लागले. पुढें श्रीराम अवतार झाला. त्यांनीं ह्या ठिकाणीं ज्या कांहीं गोष्टी केल्या, त्यापैकीं ज्या प्रसिद्ध आहेत त्याः—

राम वनवासास निघाल्यावर या दंडकारण्य नामक अरण्यांत आले. तेव्हां जटायूनीं श्रीरामचंद्रास— ॥ **वर्तो पंचवटी स्थळीं मुनिनुतीं गोदातटीं पावनी** ॥ याप्रमाणें सांगितलें. ह्मणून श्रीराम, लक्ष्मण व सीता हे पंचवटींत झोपडी करून तींत राहिले.

पंचवटींत गोदातटाकीं राहिल्यावर गंगेविषयीं सीतेचे उद्गारः—

**निववी मज मातासी श्रीमत् त्र्यंबक जटोद्भवा गंगा ॥**
**स्मरणें स्तवनें स्नानें शुचि करिति विश्वचित्त वा गंगा ॥ १ ॥**

असे आहेत.

पुढें कांहीं दिवस वास केल्यावर राम लक्ष्मण हे अरण्यांत गेल्याची संधि साधून रावण गोसाव्याचा वेष घेऊन भिक्षा मागण्याचे मिषानें झोपडीजवळ आला सीता भिक्षा घालण्यासाठीं झोपडीबाहेर आली, तों लागलीच तिला उचलून घेऊन लंकेस निघून गेला. ह्या झोपडीच्या ठिकाणास सीतागुंफा असें ह्मणतात. हें ठिकाण पंचवटींत श्रीराममंदिराजवळ आहे.

दुसरी गोष्टः—खर, दूषण, आणि त्रिशीर ह्या तीन राक्षसांस रामानें नाशिकच्या भागांत मारिलें. ह्या भागास तिवंधा ह्मणतात. हा त्रिवध शब्दाचा अपभ्रंश दिसतो.

तिसरी गोष्टः—रामगया तीर्थावर श्रीरामचंद्रजीनीं आपल्या पित्याचें ( दशरथ राजाचें ) पिंडदान केलें. हें तीर्थ चांदवडकरांच्या सांडव्यावरून पंचवटींत जातांना डाव्या हातास आहे.

चौथी गोष्टः—शूर्पणखा राक्षसीचें नाक व कान हे रामाज्ञेनें लक्ष्मणानें छेदिले, हें ठिकाण तपोवनांत गंगेंधांत आहे.

पांचवी गोष्ट:—मारीच नांवाचा राक्षस मारिला. हें ठिकाण नाशिकांत मृग-व्याधेश्वर महादेवाचे देवालयाजवळ सांगतात.

याप्रमाणें गोष्टी नाशिक पंचवटी क्षेत्रांत घडल्या. तेव्हांपासून हीं क्षेत्रें प्रसिद्ध आहेत.

नाशिक प्रांत इ० स० पूर्वी शातवाहन राजाचे ताब्यांत होता. त्यावर पुष्कळ राजे होऊन इ० स० १३१२ पासून यवनांच्या ताब्यांत हा प्रांत गेला. पुढें तो इ० स० १७२१ पासून छत्रपती शाहु राजाचे प्रधान बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यांनीं आपल्या ताब्यांत आणिला. नंतर इ० स० १८१८ पासून आजपर्यंत इंग्रज सरकारचे ताब्यांत आहे.

मुसलमानांचे ताब्यांत असतां इ० स० १६७६ त अकलीखान सरदारानें मोठमोठीं देवालयें–राम, कपालेश्वर, उमेश्वर, निमेश्वर, सुंदरनारायण इत्यादि–बाट-विलीं. ती सर्व शुद्ध करून नवी बांधिलीं गेली.

पेशव्यांचे कारकीर्दींत इ० स० १८०२ ह्यांत व ह्या नंतर ह्या प्रांतावर होळकर व त्यांचे सरदार, पेशव्यांचे कारभारी–त्रिंबकजी डेंगळे, यांनी खंडण्या घेऊन मुलुखाची फार खराबी केली. त्यांत नाशिक क्षेत्राची तर फारच दैना उडविली.

अवल पेशवाईचे कारकिर्दींत मुलखाच्या संरक्षणार्थ असलेले सरंजामी शूर सर-दारापैकीं नारोशंकर दाणी ज्यास राजेबहाद्दर ह्मणतात, त्यांनी आपल्या वास्तव्यासाठीं उद्धवदास नांवाच्या गोसाव्यापासून जागा खरेदी घेऊन तेथें एक वाडा आणि गंगा-तटाकी चित्रविचित्र कारागिरीच्या देखाव्याचें भव्य असें रामेश्वराचें मंदीर व त्यास लागूनच एक सुंदर घांटही बांधिली. आणि यांच्या आश्रयानें दुसरे संभावित गृहस्थ येऊन घरें बांधून राहिले. त्यांत नाशिक येथील दीक्षित, पटवर्धन हे मोठे सावकार त्याकाळीं नांदत होते, त्यांनीं इकडेस वस्तीसाठीं बैराग्यांजवळून कांहीं जागा विकत घेऊन नवीं घरें बांधिलीं. देवराव महादेव हिंगणे ( हल्लींच्या चांदोरीच्या जहागिरदारांचे मूळपुरुष ) पेशव्यांकडून दिल्लीपती बादशहाकडे वकील होते. त्यांनींही येथें एक विष्णुमंदीर बांधिलें. त्याचप्रमाणें श्रीमंत थोरले माधवराव साहेब पेशवे ह्यांच्या मातुश्री श्रीमती गोपिकाबाईसाहेब यांचे राजकीय प्रकरणांत राघोबादादांवरून माधव-रावाशीं बिनसल्यावरून संसाराचा त्याग करून येथून तीन कोसांवर पश्चिमेस गंगातीरीं गंगापूर क्षेत्रीं आपल्या देहाच्या सार्थकतेसाठीं निरामयस्थळीं वाडा बांधून राहिल्या होत्या. त्याही यावेळीं पंचवटींत रहाण्यास येऊन त्यांनीं आपल्या स्नान पूजादि कर्मा-साठीं श्रीगंगेच्या पात्रांत खुल्या हवाशीर जागीं खडकावर एक लहानसा मुस्तकीम

बंगला बांधिला. आणि त्या जवळूनच गंगौघ नेहमीं वाहता असावा, म्हणून सुमारें ३४० हात लांब, ४ हात रुंद व पुरुषभर खोलीचा खडक फोडून त्यांतून गंगेचा ओघ घेऊन पुढें तो लक्ष्मण कुंडास मिळवून दिला. त्या ओघास तास म्हणतात. शिवाय त्यांनीं कृष्णमंदीर व त्यास लागूनच पश्चिम अंगास खासगी देवाच्या पूजेस व राहण्यासाठीं प्रतिकृष्णमंदिर, तशीच गौशाळा व भडक दरवाजा हीं बांधिलीं. पुढें यांचे बंधु रास्ते ह्यांनींही येथें येऊन दोन तीन वाडे बांधिले. ह्या उभयतां बहीण भावांनीं त्यांच्यासंबंधानें त्यांचे आश्रित फडणीस प्रभृति मंडळीपासून तों शिपाईप्याद्यांपर्यंत जे जे लोक येऊन राहिले, त्यांस त्यांस त्यांच्या त्यांच्या स्थितीवैभवाप्रमाणें लहान मोठीं घरें बांधून दिलीं. यामुळें भडक दरवाजापर्यंत वस्ती वाढली. पेशव्यांचे सरदार खंडेराव त्र्यंबक, पुतणे रंगराव महादेव ओढेकर ह्यांनीं आपल्या कृत संकल्पानुरूप श्रीराममंदिराचा जीर्णोद्धार करून मोठ्या खर्चानें अतिरम्य, विश्रांतीदायक असें टोलेजंग मंदिर बांधिलें. ( सविस्तर वर्णन भाग ५ पहा. ) अशा रीतीनें पुढें वस्ती होत होत ज्या जागीं किर्र झाडी व श्वापदांची निरंतर गर्जना ऐकूं येई, त्या जागीं हल्लीं पंचवटी मनुष्यवस्तीनें शहराप्रमाणें गजबजून राहिलें आहे.

सुमारें चारशें वर्षांपूर्वी गौळी राजाचे वंशाचे राजे या प्रांतावर राज्य करीत असत. त्यापैकीं शेवटला राजा पतंगशाहा नांवाचा होता. त्याजपासून इ० स० १४९० त यवनांनीं हा देश घेतला, तो इ० स० १७२१ पर्यंत त्यांच्याच ताब्यांत होता. पुढें पेशव्यांचा अम्मल सुरू झाला. दक्षिणेंतील ब्राह्मणी राज्याचे पांच विभाग झाले. त्यापैकीं निजामशाही अमलाखालीं हा भाग होता. हें राज्य मोडकळीस आलें, तेव्हां त्या राज्यांतील प्रसिद्ध सरदार शहाजी याजकडे चाकरीबद्दल हा नाशिक पंचवटी वगैरे मुलुख होता, परंतु तो लौकरच दिल्लीपती शहाजहान बादशहानें परत घेतला. या प्रांतावर पेशव्यांचा पूर्ण अम्मल बसेपर्यंत मोंगलांनीं स्वाऱ्या करून कांहीं देवळें बाटविलीं व कांहीं देवळाच्या ठिकाणीं महमदी धर्म दर्शक मशिदी केल्या. असें अनेक प्रकारें जुलूम करून हिंदुलोकांस त्रस्त करून टाकिलें. ह्या भागावर मोंगल लोकांच्या अनेक स्वाऱ्या, तसेच जगजीवनराव पवार व श्रीमंत अमृतराव पेशवे, यशवंतराव होळकर यांचे सरदार इत्यादिकांची बंडें व लुटालुटी; ह्यांही करून हा प्रांत अगदीं उद्ध्वस्त होऊन वेळोवेळीं दुष्काळाच्या जाभाडांत सांपडला गेला. पंचवटी ही पेशवाई अखेर संगमनेर सरसुभ्यांतील दिंडोरी महालांत होती. अशी ह्या प्रांताची इ. स. १८१८ पर्यंत ऐतिहासिक संबंधानें माहिती आहे.

पेशव्यांचे राज्य झाल्यावर नाशिकक्षेत्रीं पेठे, रास्ते, विंचूरकर, मालेगांवकर राजेबहाद्दर वगैरे ब्राह्मण सरदार, होळकर, शिंदे वगैरे मराठे सरदार ह्यांपैकीं कांहीं राहण्यास

येऊन वाडे, देवळें व कांहींनीं फक्त मोठमोठीं देवालयें, धर्मशाळा, कुंडें बांधून अजरामर कीर्ति करून ठेविली आहे. त्यांची माहिती शेवटीं दिली आहे.

वस्तीः—ह्या नाशिकांत आजपर्यंत वस्तीच्या चार पिढ्या झाल्या त्याः—

[ १ ] यवनांचें राज्य होण्यापूर्वी, हल्लीं स्मशानभूमी आहे, तिचे पूर्वेस तपोवनापर्यंत गंगाकांठींही अगदीं उजाड आहे.

[ २ ] यवनांचें राज्य झाल्यावर त्या अलीकडे नऊ टेकड्यावर वस्ती झाली. हीही पूर्व अंगास उजाड होत चालली आहे.

[ ३ ] पेशव्यांचें राज्य झाल्यावर नवापुरा, खडकाळी, आदितवार पेठ, मातबरपुरा, नवी तांबट आळी, सुंदरनारायण आळी, इत्यादि ठिकाणीं वस्ती वाढली.

[ ४ ] सांप्रत स्टेशनच्या बाजूसही बरीच वस्ती झाली आहे. शहरच्या पश्चिम अंगास नवी कचेरी कोर्ट, वकील लोकांचे नवीन बंगले झाले असून शरमापुरी ( ख्रिस्ती लोकांचें राहण्याचें ठिकाण ) पावेतों वस्ती वाढत चालली आहे. हायस्कूलची इमारत पाहण्यासारखी आहे.

पंचवटीची जुनी वस्तीः—पाथरवट आळी ऊर्फ नरसिंहपुरा होय. त्या वस्तीचें पश्चिमेस बैरागी लोकांचे मठ होते. व श्रीरामाचें पुरातन देवालय वहीरोबाचें स्थान व कपालेश्वर मंदीर हीं होतीं. व त्याठिकाणीं वस्ती होत जाऊन, पेशवाईत रास्ते, हिंगणे, राजेबहादर ह्या सरदारांनी वस्ती करून ती वस्ती गंगाकिनाऱ्यापर्यंत वाढली. हल्लीं मुंबईच्या धार्मिक श्रीमान् भाटे लोकांनी मोठमोठ्या धर्मशाळा, देवळें बांधिलीं आहेत. यामुळें या वस्तीस मोठी शोभा आली आहे.

फार पूर्वी कनोजे व गोळक यांची वस्ती व वृत्ति असावी असा अदमास आहे. पुढें प्रभु, धर्माधिकारी व त्यांनीं आणिलेलीं ब्राह्मणकुळें यांची वस्ती सुमारें ७०० वर्षांपासून आहे. सुमारें ४०० वर्षांपासून कोकणस्थांचीं ६ कुटुंबें येथें आलीं. पुढें वस्ती वाढत चालली. या क्षेत्रीं धर्मसंबंधीं वावीचे हक्क प्रभु धर्माधिकारी यांचे आहेत.

मुसलमान लोकांची वस्ती इ० स० १३०० नंतर येथें झाली. या लोकांनी या शहरास गुलशनाबाद हें नांव दिलें.

ह्या शहरास १४ दरवाजे आहेत. त्यापैकीं त्र्यंबक दरवाजा, काजिपुरा दरवाजा, भगुर दरवाजा, नांव दरवाजा, दिल्ली दरवाजा, हत्ती दरवाजा व आसराची वेस, हे नाशिकांत व मडक दरवाजा हा पंचवटींत कायम आहेत.

ही वस्ती नऊ टेकांवर आहे. त्यांची नांवें:—[ १ ] पठाणपुरा टेक. [ २ ] जुमामशीद टेक. [ ३ ] दुर्गा टेक. [ ४ ] कोंकणी टेक. [ ५ ] गणेश टेक. [ ६ ] जोगवाडा टेक. [ ७ ] डिंगर आळी टेक. [ ८ ] चित्रघंटा टेक. [ ९ ] म्हसरूळ टेक हे आहेत. यांत एकपासून चार टेकांवर मुसलमान वस्ती आहे. बाकी टेकांवर इतर वस्ती आहे.

येथें नऊ दुर्गा आहेत. त्या:— [ १ ] दुर्गा. [ २ ] महालक्ष्मी. [ ३ ] रेणुका. [ ४ ] कालिका. [ ५ ] भद्रकाळी. [ ६ ] चित्रघंटा. [ ७ ] गोंधळ्यांची देवी. [ ८ ] गर्ग्यांची देवी. [ ९ ] पाराशऱ्यांची देवी. शिवाय पंचवटींत सप्तश्रृंग देवीचा तांदळा म्हणून देवी गंगाकाठीं रामेश्वराजवळ आहे.

# भाग ३ रा.

## यात्रावर्णन.

पूर्वी रस्त्याच्या गैरसोई व दंगा धोपा इत्यादि कारणांमुळें या क्षेत्रीं यात्रेकरू येण्याचें मान फार कमी होतें. प्रसंगवशात् कपिलाषष्ठी सिंहस्थ यामध्यें मात्र जागोजागींहून यात्रस्थ मोठ्या मेळ्यानें येत असत. परंतु सांप्रतचे राज्यांत त्या सर्व गैरसोई व अडचणी दूर होऊन, उत्तम सडका झाल्यामुळें, तसेंच आगगाडी ह्या प्रांतांतून चालू झाल्यापासून, या क्षेत्रीं यात्रेकरू येण्याचें मान गेल्या ४०।४५ वर्षांपासून वाढत चाललें आहे, तें असें कीं, आली अर्धोदय महोदय पर्वणी, चंद्र सूर्य ग्रहण किंवा उजाडली सोमवती अमावास्या, कीं, आल्याच शंभर दोनशें कोसावरून यात्रेकरू लोकांच्या झुंडीच्याझुंडी. येणेंकरून क्षेत्रस्थ उपाध्ये त्यांचे घरीं सदैव एखाद्या कार्याप्रमाणें गर्दी असते.

यात्रेकरू क्षेत्राच्या सीमेंत आला, किंवा आगगाडींतून नाशिक स्टेशनवर उतरला कीं, तुमचें नांव, उपनांव, वास्तव्य वगैरे विचारण्याकरितां क्षेत्रस्थ भिक्षुकांचे थवेच्याथवे खांद्यावर नामावळीच्या चोपड्यांसह येऊन ठेपलेच. अगोदर दुरून चालून आल्याचा धकवा, आणि त्यात ह्या भिक्षुक मंडळीची विचारण्याची कावकाव, येणेंकरून तो यात्रेकरू फार त्रास पावून, ज्या जवळ पूर्वजांचे लेख निघतील तो आपला क्षेत्रस्थ उपाध्याय समजून त्यांचे घरीं जातो. तथापि इतर उपाध्ये हा आपला यजमान कदाचित् निघेल, अशा समजुतीनें चोपड्यांच्या पोतड्या घेऊन येऊन वरचेवर त्रास देतच असतात. पंचवटी व नाशिक ह्या क्षेत्रींचे उपाध्ये एकच आहेत, हा उपाध्ये-

पणाचा धंदा सुमारें ४२५ वर्षांपासून चालत आला आहे; असें ह्यांच्या वह्यांवरून समजतें.

पद्मपुराणांत यात्राक्रम लिहिला आहे. त्यांतील तात्पर्य—" घराहून यात्रेस निघण्यापूर्वी आपले घरीं नित्यकर्म ( ब्रह्मकर्म ) करून मग पुण्याहवाचन व नांदीश्राद्ध करावें, आणि मनांत गोदेचें स्मरण करून शिव, विष्णु, सूर्य, गणपती, देवी, तसेच सर्व देव आणि पितृगण, यांची प्रार्थना करावी कीं, मी गोदायात्रेस जातों; तुह्मीं सर्व माझ्या सहवर्तमान चला. नंतर गोदेची प्रार्थना करावी कीं, हे गोदावरी, मी ब्रह्मचर्य व्रत धारण करून तुझी यात्रा करीन. तूं मजवर दया करून ही यात्रा निर्विघ्नपणें सिद्धीस ने; पुढें प्रतिदिवशीं पहांटेस स्नान करून भोजन केल्यावांचून चालावें. जेथें दोनप्रहरचें आन्हिक तेथेंच संध्याकाळची संध्या करावी. दुसरे दिवशींही तसेंच चालावें. अशाप्रकारें पंचवटी अगर नाशिक क्षेत्रीं गोदेजवळ आल्यावर वाहन किंवा जोडा जें असेल तें सोडून कांहीं भाग पायांनीं चालून जाऊन तीर्थास साष्टांग नमस्कार घालावा. गोदेचें अवलोकन करून प्रार्थना करावी कीं, " हे जगदोद्धारिणी श्री गोदे ! मी पापी आहे, माझा उद्धार कर. या जन्मीं अथवा जन्मजन्मांतरीं जें कांहीं पातक मजकडून घडलें असेल, तें तुझ्या कृपेनें लयास जावो. " अशी पार्थना करून मंत्रपूर्वक सचैल ( वस्त्रासह ) स्नान करून क्षौर करवावा. नंतर शुद्ध स्नान करून मंत्रपूर्वक क्रमानें गोमय, मृत्तिका, भस्म हीं अंगाला लावून स्नान करावें. त्या दिवशीं उपवास करून दुसऱ्या दिवशीं श्राद्ध करावें. आणि तिसरे दिवशीं गंगापूजन करून ब्राह्मणभोजन घालावें. नंतर पंचवटींतील श्रीरामचंद्राचें दर्शन करून पुढें त्र्यंबक क्षेत्रीं गमन करावें. तेथें गेल्यावर कुशावर्ती स्नान करून श्राद्धादिकर्म करावें. श्रीमत् त्र्यंबकराज यांचें दर्शन घेऊन पुन्हां नाशिक क्षेत्रीं येऊन पंचवटीनिवासी जगदोद्धारक श्रीराम ह्यांचे चरणीं लीन होऊन, स्वगृहीं परत जाण्याचा मार्ग स्वीकारावा.

गौतमऋषीनें बृहस्पती सिंहगत असतां गोदावरी पृथ्वीवर आणिली, ह्मणून त्यावेळीं जो कोणी गौतमीचें स्नान करून पितरांच्या उद्देशानें श्राद्ध करितो, त्याचे सर्व पितृगण बारा वर्षे तृप्त राहतात. आणखी गोदान, भूमिदान व विशेषेंकरून अन्नदान केलें असतां तें अक्षय्य होतें. समुद्रादिक संपूर्ण तीर्थें, काशी आदिकरून सर्व पवित्र पुऱ्या, इंद्रादि सकल देव, अकरा रुद्र, बारा आदित्य, एकुणपन्नास मरुद्गण हे सर्व त्यावेळीं गौतमींच्या तिरीं स्नानासाठीं येतात. गंगा यमुना, सरस्वती, कृष्णादि महानद्या येऊन वर्षभर गौतमींत राहतात. ह्मणून ही यात्रा मनुष्यमात्रांनीं अवश्य करावी. ह्या सिंहस्थसंबंधीं यात्रेचा क्रम वर लिहिल्याप्रमाणेंच समजावा. येथील उपाध्ये यात्रेकऱ्यांकडून गंगाभेट, तीर्थविधि, देवब्राह्मण, देवदर्शनें करवितात.

उभय क्षेत्रांची गंगा प्रदक्षिणा:—प्रथम प्रातःकाळीं स्नान संध्यादि कर्म करून नंतर सुंदरनारायणाचें दर्शन घेऊन धारपुरे यांचे घाटावर हरिहरेश्वराचें दर्शन, नारोशंकराचे घाटावर अग्नितीर्थ, त्यापुढें कोटितिर्थी स्नान व कोटेश्वर महादेव दर्शन घेऊन गंगापैल पंचवटीच्या बाजूनें बायजाबाईच्या छावणीवरून नव्या पुलावर श्रीविठ्ठल, कपालेश्वर, काळाराम, सीतागुंफा, तपोवन, व त्यांतील देवदर्शन, ब्रह्मयोनी वगैरे तीर्थी स्नान करून शूर्पणखा दर्शन घेऊन पैलतीरास सप्तऋषी कोठड्यावरून, टाळकुटे देवळावरून दुर्गा, सत्यनारायण, रोकडोबा, मोडकांचा गणपती, भद्रकाली, मुरडेश्वर, तीळभांडेश्वर, बालाजी, मुरलीधर, वृद्धेश्वर, गणपती, पंचरत्नेश्वर, गोराराम, नीळकंठेश्वर, यशवंतराव महादेव, दत्तभटजी महाराज यांचें दर्शन घेऊन पुन्हां सुंदरनारायणीं यावें; ह्मणजे गंगा प्रदक्षिणा पूर्ण झाली.

नगर प्रदक्षिणा:—मोडकांच्या गणपतीचें दर्शन घेऊन, पंचवटींतील महामारी, गणेशवाडींतील गणपतीवरून नाशिकांतील महालक्ष्मी, रेणुका, कालिका, ढोल्या गणपती, गाडगीळांची देवी, हरिहरेश्वर, तेथून डोंगर उताऱ्यानें पैलतीरास जाऊन विठोबा, कारव्या मारुती, तपोवन, सप्तऋषी कोठड्या, टालकुटे देवालय, दुर्गादेवीवरून पुनः मोडकांच्या गणपतीचें दर्शन घ्यावें. ह्मणजे नगर प्रदक्षिणा पूर्ण होते. मध्यंतरीं लहान लहान देवस्थानें आहेत. त्यांचीं दर्शनें घ्यावीं.

पंचवटी क्षेत्र प्रदक्षिणा:—प्रथमतः रामकुंडावर स्नान करून कपालेश्वर, इंद्रकुंड, श्रीविठ्ठल, अग्नितीर्थ, कारव्या मारुती, गणेश वाडींतील श्रीगणपती, मुक्तेश्वर, वरुणा, गंगा, संगमतीर्थ, रामगया, देवी, श्रीराम, यांचीं क्रमानें स्नानें दर्शनें वगैरे करून पुनः रामकुंडावर येऊन स्नान करावें, नंतर घरीं जावें.

---

## भाग ४ था.

### श्रीराममंदिर.

नाशिक पंचवटी क्षेत्रांत पुष्कळ देव देवालयें आहेत. पंचवटींत श्रीराममंदिर, कपालेश्वर हीं अनादिसिद्ध असून शिवाय गोराराम, दत्तमंदिर, चंद्रमौळेश्वर, गंगामंदिर, कार्तिकस्वामीचें मंदिर व श्रीशंकराचार्यांचा मठ व मूर्ति, नारोशंकराचें महादेवाचें देऊळ, हीं अलीकडील आहेत. नाशिकांत श्रीमंत देवस्थान श्रीबालाजी असून तिळभांडेश्वर, सुंदरनारायण, श्रीभद्रकाली देवी हीं प्रमुख असून गोराराम, मुरलीधर, गणपती, दत्त

यांचीं मंदिरें असून कालानुरूप त्याचे उत्सव होत असतात. या क्षेत्रांतील मुख्य दैवत श्रीरामचंद्र असल्यानें त्यांच्या मंदिराचें साग्र वर्णन दिलें असून बाकीच्या देव देवालयांची संक्षिप्त यादी पुस्तकाचे शेवटीं दिली आहे.

श्रीरामाचें पुरातन लहानसें मंदिर श्री० ओढेकर यांनीं बांधलेलें असून त्यांच्या वंशांतील पेशवाई राज्यांत भरभराटीस आलेले सरदार खंडेराव त्र्यंबक व त्यापुढें रंगराव महादेव ओढेकर यांनीं त्याचा जीर्णोद्धार केला. श्रीमति गोपिकाबाईसाहेब या प्रांतीं आल्यावेळीं बरोबर ओढेकर असतां श्रीरामदर्शनास गेल्या. तेव्हां मंदिर लहान व मोडकळीस आलेलें पाहून ह्मणाल्या कीं, हें मुख्य देवस्थान असून त्याच्या जीर्णोद्धाराकडे कोणाचेंच लक्ष नाहीं हें आश्चर्य आहे. तेव्हां ओढेकर यांनीं उत्तर केलें कीं, हें मंदिर आमच्या पूर्वजांनीं बांधिलें असून त्याचा जीर्णोद्धार करण्याचा आमचा हेतु बरेच दिवसांचा आहे. त्याप्रमाणें काम लवकर सुरू होईल. व तेव्हां पासून कामास सुरुवात झाली.

तेवेळीं असलेल्या मंदिराची जागा फारच लहान असल्यामुळें सभोंवतालच्या जागीं लोकांचीं असलेलीं घरें मठ व श्रीमार्तंडाचें लहानसें देवालय हीं घेऊन त्याऐवजीं मालकांस आसपास घरें मठ वगैरे बांधून दिलीं. अशा रीतीनें पूर्वपश्चिम २६६ फूट लांब आणि दक्षिणोत्तर १३८ फूट रुंदीची खुली जागा करून घेऊन तिच्या सभोंवतीं ४ फूट रुंदीचा मुस्तकीम कोट चिरेबंदी बांधिला. कोटास लागून आंतील भागीं चौफेर ११ फूट रुंदीची यात्रेकरू लोकांस उतरण्यासाठीं धर्मशाळा ह्मणजे ओऱ्या बांधिल्या. या ओऱ्यांवर दगडी पाटाई असून त्यांवर चुनेगची केलेली आहे. कोटाचे भिंतीस पूर्व पश्चिम दक्षिण व उत्तर असे समोरासमोर चार दरवाजे असून पूर्वेकडील दरवाजा सर्वांत मोठा आहे. त्यास महादरवाजा ह्मणतात. त्यावर दक्षिणोत्तर लांबी ५२ व रुंदी २१ चा दुमजली विटबंदी नगारखाना बांधिला आहे. उत्तर दरवाजाचे बाहेर कोटास लागून पूर्वभागीं गोसावी यांस आखाडा व पश्चिम अंगास रामाचे पुजाऱ्यांस राहण्यासाठीं घर अशीं बांधून दिलीं. दक्षिण दरवाजानें बाहेर जातांना पश्चिम भागचे ओरींत श्रीमार्तंडाची स्थापना करून त्याचे पुजाऱ्यास बाहेरचे बाजूस घरें बांधून दिलीं. ओऱ्यांचे पुढें सभोंवार चिरेबंदी पटांगण बांधून काढिलें. त्यांत नैऋत्य कोपऱ्यावर जेथें पूर्वीचें राममंदिर व त्यापुढें लहानसा लांकडी सभामंडप होता, तेथें देवालय बांधण्याचे आरंभीं निर्विघ्नतेसाठीं पाषाणाची श्रीगणपतीची मूर्ति करून ती चौथऱ्यावर स्थापिली. ही मूर्ति पूर्वी कारागिरीविद्या किती पूर्णतेस आली होती, तिचें निदर्शक आहे. इतकी ही मूर्ति सुबक व सुरेख आहे. मंदिराचा पाया पाणी लागे पावेतों खणला होता. त्याची खूण वायव्य कोपऱ्यांत जी विहिर आहे ती होय. पाया भरून काढतेवेळीं ही विहीर त्यांतून

बांधून काढिली. महाद्वाराच्या ओरीपुढील ४७ फूट पटांगण सोडून, पूर्वपश्चिम चिरेबंदी दगडी पाटाईचा तीन दालनी ७३॥ फूट लांब, ३२ फूट रुंद, १० फूट उंच, ४० खांबी असा प्रशस्त सभामंडप बांधला आहे. त्यांत पूर्व भागीं कडेवर पश्चिमाभिमुख श्री दासमारुतीची उभी मूर्ति आहे. मारुतीचें दर्शन घेऊन पश्चिमेकडे तोंड फिरविलें असतां श्रीराम दर्शन होतें. सभामंडपाचा उपयोग कथाकीर्तन, पुराण यांकडे होतो. सभामंडपाच्या वायव्य कोंपऱ्यास मारुती व दत्त यांची पूर्वाभिमुख लहान देवळें आहेत. पटांगणांत सभोंवार ओऱ्यांचे पुढें सारख्या अंतरावर झाडें लावण्यासाठीं विस्तृत आळीं करून ठेविलीं असून त्यांतून अशोकाचीं झाडें आहेत.

सभामंडपाचे पश्चिमभागास १९ फूट व दक्षिणोत्तर ओऱ्यांपासून १९ फूट अंतराचें पटांगण सोडून, ३९० फूट लांबीचें व ६९ फूट उंचीचें पूर्वाभिमुख तीन दालनीं असें पाषाणमय भव्य मंदीर बांधिलें. मंदिरांत जातांना ११ पायऱ्या चढून गेल्यावर पहिलें दालन लागतें. हें पूर्व पश्चिम लांब १२॥ फुट व रुंद ११॥ फुट असून दक्षिणोत्तर भिंती ४ फुट उंचीच्या बांधून वर खुल्या ठेविल्या आहेत. याच दालनांत १२ घंटा टांगलेल्या आहेत. पुढें दुसऱ्या दालनांत जाण्याच्या दरवाजाच्या आतील १ पायरी उतरून दुसरें मध्य दालन आहे. यास दक्षिणोत्तर असे दोन दरवाजे आहेत. त्यांतून बाहेर पटांगणावर येण्यास १३ पायऱ्या आहेत. पायऱ्याचे दोन्हीं अंगास दर्शनास येणारे लोकांस बसण्यासाठीं चौथरे बांधले आहेत. आंतील तिसरें दालन म्हणजे मुख्य गाभारा यांचेमध्यें सुमारें ८ फुट रुंदीच्या दालनाशिवाय, यात्रेकरूंस तीर्थ वगैरे देण्यासाठीं बसणारांस पृथक जागा आहे. याचठिकाणीं पितळी पत्र्यानें मढविलेली लाट आहे. दरवाजानें गाभाऱ्यांत गेल्यावर समोरच सिंहासन व त्यावर रौप्यमय शेष चिन्हांकित एकास एक लागून असलेल्या तीन प्रभावळींतून श्रीराम लक्ष्मण व श्रीसीता या तीन मूर्ति विराजमान आहेत. या सिंहासनाचे दर्शनी भागावर " खंडेराव त्र्यंबक व रंगराव महादेव ओढेकर हे शब्द खोदले आहेत. या गाभाऱ्यावरील घुमट सर्वांत उंच असून शंकाकृति आहे. याजवरील कळस ४ फुट उंचीचा, सहा फुट घेराचा असून त्यावर तशाच घाटाचा तांब्याचा कळस कोणीं मोठ्यानें बसविला आणि त्याजवर नाशिक येथील प्रभाकर दिवाकर पंगेवैद्य यांनीं एक मुंबईचा श्रीमान् व्यापारी जलोदर ग्रस्त होता त्यास बरा करून त्याजकरवीं सोन्याचा मुलामा देवविला. अशारीतीनें हा सुवर्णमय कळस वर विलसत असून त्यावर हनुमान चिन्हांकित ध्वजा फडकत आहे. हा कळस व दुसरें दालन यांचे दरम्यान असलेल्या जागीं चिरेबंदी भिंतीवर सिंहाचें मोठें चित्र बसविलें असून पुढें दुसरें व पहिलें दालन यावरील दगडी कळस अनुक्रमें लहान व उतरते आलेले आहेत.

यात्रेकरू पटांगणावरून प्रथम दर्शनीं अवाढव्य विस्तृत व सुंदर मंदिराचा रम्य देखावा व दर्शनास येणाऱ्या अनेक देशीय लोकांचा समूह पाहून, मंदिरांत जाऊन त्या सांवळ्या अतिरम्य व शांत अशा श्रीराम लक्ष्मण व सीता या तीन मूर्तींचें रूप नेत्रेंद्रियांत पूर्णपणें सांठवून, देवांचे अंगावरील सुवासिक पुष्पहारांचे सुगंधानें व अंगास चर्चिलेल्या सौगंधिक परिमळानें घ्राणेंद्रियांस समाधान व स्थैर्य देऊन, श्रीरामपादोदक तीर्थांच्या अमृततुल्य रुचीनें रसनेंद्रियांस तुष्टी देत देत मंदिराबाहेर पडल्यावर व प्रदक्षिणा घालतांना भोंवतालच्या अशोक वृक्षावरून येणाऱ्या झुळूकदार मंद वायूच्या स्पर्शानें त्वगिंद्रियांस गार करून त्रिकाळ झडत असलेल्या चौघड्यावरील सनयांच्या जोडावरील वेळवेळींच्या रागदारींचे मधुर तानयुक्त स्वरानें व सभामंडपांतील पुराण कीर्तनादिकांच्या उच्च मधुर स्वरेंकरून कर्णेंद्रियांस तृप्ति देऊन, प्रापंचिक तापापासून शांतता पावून कांहीं कालपर्यंत देहाची विस्मृति पावतो.

या देवालयास लावलेले दगड रामशेज ह्मणून ३ कोसांवर एक डोंगर आहे, तेंथून आणून ते भाजून त्यांत पक्के कायम झालेले या कामीं लाविले आहेत. ह्मणून देवळाचें काम अगदीं साधें आहे. जडाईचें काम मात्र मोठ्या कुशलतेनें विनरेष केलें आहे.

या मंदिराची प्राची दिशा वे० यादवशास्त्री कास्थ या ज्योतिषी विद्वान् ब्राह्मणानें इतक्या नेमकेपणानें साधून दिली आहे कीं, मेष व तुला या दोन संक्रांतीस ह्मणजे भूमध्य रेषेवर सूर्य येणारे दिवशीं सूर्योदयाबरोबर सूर्यकिरण श्रीमुखावर पडतें. अशी दिशा साधल्यामुळें अति शूद्रादिलोकांस महादरवाजाबाहेरून श्रीचें दर्शन होतें.

या देवालयाचें काम शके १७०० ह्मणजे इ० स० १७७८ मध्यें सुरू होऊन श.के १७१२ सन १७९० त संपूर्ण झालें. आणि लागलीच अर्चा होऊन देवांची स्थापना झाली. अर्चेच्यावेळीं देवास पुष्कळ उंची वस्त्रालंकार अर्पण केले. शिवाय श्रीरामनवमीच्या उत्सवाप्रीत्यर्थ आपले जहागीरीपैकीं सालिना ९०० रुपये उत्पन्नाचा मौजे शिंगवें हा गांव देवाचे नांवें जहागीर करून दिला. चौघड्यासाठीं आपल्या हतगड महालांतून दरमहा १०८ रुपयांची ह्मणजे सालीना १२९६ रुपयांची नक्त नेमणूक सुरू केली. हें मंदिराचें काम एकंदर १२ वर्षें चालून त्या कामीं बावीस लक्ष रुपये खर्च लागला.

श्रीत्र्यंबकेश्वराचें मंदिर व संस्थान जसें पेशव्यांचे नांवें चालू आहे. त्याप्रमाणेंच ओढेकरांनीं श्रीराममंदिरास केलेला खर्च आपण देऊन हें पंचवटी श्रीराममंदिर व संस्थान पेशव्यांचे नांवें चालू करावें अशी आकांक्षा श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब यांचे मनांत

उत्पन्न झाली. पुढें पेशवे या क्षेत्रीं आल्यावेळीं त्यानीं मंदिरास झालेल्या खर्चाचे कागदपत्र ओढेकर यांजपाशी पाहण्यास मागितले. ओढेकर यांनी श्रीमंताचा हेतु जाणून कागदपत्र न दाखवितां गंगेंत बुडविले. ह्यावरून सरकारस्वारीं रोष होऊन श्रीच्या चौघड्याची नेमणूक त्यांनीं जप्त केली. आणि २२ रुपयांची नेमणूक कमी करून ८६ रु. दरमहाची मात्र कायम ठेविली. व ती सतत चालावी म्हणून श्रीरामाचे नांवें सनद करून दिली. ह्याप्रमाणेंच हल्लीं इंग्रज सरकारांतून त्याबद्दल ९९० रुपये मिळत आहेत.

याशिवाय श्रीराम संस्थानाकडेस इतर नेमणुका आहेत त्या—

| गांव, | रोख उत्पन्न. | |
|---|---|---|
| १ भगतवाडी. | ३०० | चंदूलाल दिवाण नि० निजामसरकार. |
| | ४०० | रामदुर्ग संस्थानचे राजे. |
| | ६०० | रेव्याचे राजे. यांत १५० पुराणिकांच्या नेमणुकीचे आहेत. |
| | १०० | होळकर सरकार. |
| | १४०० | |

येणेंप्रमाणें नेमणुका दरसाल चालू आहेत. शिवाय राजे रजवाडे जहागिरदार आदिकरून संपन्न गृहस्थांकडून पुष्कळ लहान मोठ्या किंमतीचे डागडागिने चांदी वगैरेची उपकरणीं, उंची पोषाकाच्या देणग्या वेळोवेळीं मिळाल्याचें ऐकिवात आहे. पण तसे देवाच्या अंगावर फारसे दिसत नाहींत. श्रीच्या संस्थानच्या खर्चाची सर्व व्यवस्था येथें केवळ एकट्या पुजाऱ्याच्या हातीं आहे, ही आश्चर्याची गोष्ट आहे. नगारखान्याची नेमणुकीची जशी पंचामार्फत व्यवस्था चालते तशीच इतराकडील नेमणुकांच्या खर्चाची व देवास मिळालेल्या व मिळणाऱ्या आजबाबाची पंचामार्फत देखरेख असती तर देव इतक्या दीन स्थितींत आढळते ना असें वाटतें.

चालूसालीं श्रीरामनवमीस सोन्याचा मुकुट केला आहे. नेहमींच्या पाहण्यांत ट ामाच्या हातास जोडलेले सुवर्णाचे पंजे, गळ्यांत लहानसा गोफ, कंठा, मोत्यांची व ..ा, कानांत कुंडलें, शिरपेच वगैरे; सणावारी सुवर्णाचा मुकुट, याहून कांहीं कमी लक्ष्मणास इतकें मात्र दिसत असून श्रीसीताबाईस नाकांत नथ, गळ्यांत ठुशी, वज्रटीक जवांची व पुतळ्यांची माळ; मस्तकीं बिंदी, बिजोरा असे एकेरी डागिने दृष्टीस पडतात. देवास लवाजमा—पालख्या २, एक मोठी भरजरीची इंदुरची बुळेसरकराकडील,

व एक लहान होळकरांकडील, अबदागिरी २, मोरचेलें २, चौऱ्या २, भालदारीच्या रौप्यमय काठ्या २, रथ २, मोठा रास्त्यांनीं केलेला. व एक लहान विष्णु बापुजी सोमण तळेंघोसाळेकर व शिवराम मोरेश्वर गाडगीळ वांईकर यांनीं करून दिलेला.

प्रतिदिवशीं पहांटेस काकडआरती, त्रिकाळ पूजा व रात्रौ शेजारति होऊन भोग मूर्तीस निजवितात.

प्रति एकादशीस श्रीरामाची पालखी मोठ्या थाटानें मंदिरासभोंवतीं मिरवते. आणि विजयादशमीस श्रीची स्वारी पालखींत विराजमान होऊन सर्व लवाजम्यासह मिरवत सीमोल्लंघनास जाते. स्वारी परत येतांना थोडें दारुकाम सोडतात. चैत्र शु० १ पासून नवमीपर्यंत ९ दिवस मोठा उत्सव होतो. त्या दिवसांत दुवक्ता पुराण. मध्यंतरीं गवयांचें गाणें; रात्रौ हरिकीर्तन असा पाठ असून एक दिवस ब्राह्मण संतर्पण होतें. नववे दिवशीं कीर्तन सुरू होऊन दुपारीं श्रीरामजन्म होतो. त्यावेळीं बाहेर गांवचे यात्रेची व गांवकरी लोकांची एकच गर्दी होऊन रामदर्शनास मोठी भीड पडते. यावेळीं मंदीर सभामंडप व पटांगणही माणसांनीं फुलून गेलीं असून साखर, फुटाणे, पेढे लांबवर उडवित असतात व ते वेंचून प्रसाद ह्मणून घेण्यासाठीं व भराभर खाण्यासाठीं धांवणाऱ्या मुलांची हुल्लड उडून राहिलेली असते. एवंच सर्व मंदिर गजबजून जाऊन सर्वत्र एकच उत्सवानंदध्वनी चोंहोंकडेस पसरून हें स्थान केवळ आनंद भुवनच भासतें. पुढें शु० ११ रथोत्सवाचा थाट होतो. तो मोठ्या रथांत श्रीच्या भोग मूर्ति, व दुसऱ्या लहान रथांत त्यास विमान ह्मणतात, त्यांत पादुका ठेवतात. रथ ओढण्यास दोहींकडे जाड नाडे लांबच-लांब बांधिलेले असतात. त्यास दुतर्फा लोक लागून ओढतात. अशा रीतीनें दोनप्रहरीं पूर्व अंगानें मंदिराबाहेर रथ निघून कारख्या मारुतीच्या बाजूनें गणेशवाडींतून गंगा-किनाऱ्यानें पटांगणावर श्रीची स्वारी येते. ते वेळची शोभा काय वर्णावी? श्रीराम रथांत आरूढले आहेत, मारुती सारथ्य करीत आहे, वर चवऱ्या ढळत आहेत. मोरचेलें वारत आहेत. पुढें भजनी मंडळींच्या ताफ्याताफ्यांतून टाळ झांजाचे ध्वनि व हरिनामाचा घोष मोठ्या उंचस्वरानें ऐकूं येत आहे. लेजीमवाल्याची खेळण्याची अहमहमिका चालू आहे. त्यापुढें गाड्यावर दुंदुभी झडत आहेत. आसपास शें हजारों यात्रेकरू व क्षेत्रस्थ लोकांची एकच गर्दी होऊन राहिली आहे. भाविक देवश्रमानें घर्मयुक्त झाले आहेत. असें मानून आपापल्या उत्तरीय वस्त्रांनीं वा आपापल्या पदरांनीं पालवीत आहेत. मधून मधून गुलाल उधळून झोळ्यांच्या झोळ्या रिकाम्या होत आहेत; लोक घामाघूम होऊन त्यांच्या अंगावरून त्या उडवलेल्या ऱ्याचे फवारे उडत येऊन त्यांच्या तोंडावर लाल झांक मारीत आहे, हा अपूर्व

देखावा व चमत्कार पाहून अभाविक जनही भावीक बनेल. भावीकभोळ्या लोकांस प्रेमानें आनंदाश्रु आल्यास नवल काय ? असो तेथून गंगाकिनाऱ्यावरून मिरवत मिरवत रात्रीचे आठ वाजतां रामकुंडावर येऊन थडकल्यावर तेथें श्रीची षोडशोपचार पूजा होते. पुनः देव रथांत बसून श्रीकपालेश्वरास सव्य घेऊन दोनप्रहर रात्रीचे सुमारास स्वारी मंदिरांत प्रवेश करिते. या दिवशींची १५ रुपयांची महापूजा रथापुढील रोषनाई, दारूकाम व रथ ओढणाऱ्या नेमणुकीच्या मंडळीस देण्याकरितां सुमारें १०० नारळ आणि प्रसंगानुसार रथाची दुरुस्ती इत्यादि खर्चासाठीं दरसालची १९२ रुपयांची श्री० रास्त्यांची देणगी ह्मणून इंग्रज सरकारांतून चालू आहे. हा सर्व खर्च रास्ते यांचे कारकुनामार्फत होतो.

---

# भाग ५ वा.

## गंगेचा देखावा.

गंगा [ गोदावरी ] हिचा उगम त्र्यंबकेश्वराजवळील सह्याद्रीच्या भागापैकीं ब्रह्मगिरीपासून असून पुढें त्र्यंबकक्षेत्र, चक्रतीर्थ, ह्यावरून पूर्ववाहिनी वाहत येऊन नाशिक पंचवटी ह्या दोन्हीं क्षेत्रांच्या मधून दक्षिण वाहिनी होऊन पुनः पूर्ववाहिनी गेली आहे. पंचवटी व नाशिक ह्यांचे दरम्यान वाहत असलेल्या गंगेत स्थानमहात्म्येंकरून पुष्कळ तीर्थें आहेत. त्यांत रामतीर्थ अस्थिविलयतीर्थ व रामगयातीर्थ हीं तीर्थें आबालवृद्धांस माहीत असल्यामुळें त्याविषयींचा महिमा पहिल्या भागांत दिला आहेच.

ह्या दोन्हीं क्षेत्रांच्या मधून वाहणाऱ्या श्रीगंगेच्या दोन्हीं तीरांस श्रीमान औदार्यशील लोकांनीं आपलें चिरकाल नांव राहण्यासाठीं सारख्या हारीनें घाट, देवालयेंहीं बांधिलीं असून गंगौघांत एकासएक लागून ओळीनें लक्ष्मण, धनुष्य, राम, सीता, अहिल्या, शार्ङ्गपाणी, तात्यामहाराज, लक्ष्मीशंकर, राजेबहादूर, रामगया, ओक, या नांवांचीं विस्तृत कुंडें असून तीं पुष्करणीं प्रमाणें शोभत आहेत. प्रत्येक कुंडाचे मध्यें पैलऐल जाण्यास व येण्यास फरसबंदीचे सुमारें पांच हात रुंदीचे उन्हाळीमार्ग केलेले आहेत. त्यास सांडवे ह्मणतात. त्यांतून गंगौघ सतत वाहत राहण्यासाठीं मधून मधून खोल व रुंद अशा पन्हळया सोडल्या आहेत.

पहांटेच्या चार वाजल्यापासून रात्रीच्या आठ नऊ वाजेपर्यंत उभय तीरांस ह्या घाटकुंडावरून मनुष्याच्या गर्दीनें गंगा नेहमीं गजबजलेली असते. त्यांत सकाळच्या नऊ दहा वाजेपर्यंतचा देखावा फारच रमणीय आणि सुशोभित दिसतो. दुतर्फा घाटा-

वरून स्नानादिकांकरितां पुरुष, स्त्रिया आणि मुलें ह्यांची एकच धूम उडून कित्येक स्नानसंध्याशील ब्राह्मण स्नानें करून अंगास भस्म विलेपून शालजोड्या, पामऱ्या, धावळ्या इत्यादि पांघरून नाकें धरून प्राणायाम करीत आहेत; कोणी मार्जनें करून गंगोदक शिरावर उडवीत आहेत; कोणी गोमुख्यांत हात उडवीत जपध्यानीं निमग्न झाले आहेत; कित्येक स्नान करितांना अघमर्षण करून मोठ्यानें "हर गंगे" "हर गोदे" इत्यादि शब्द उच्चारून बुड्या मारीत आहेत; कित्येक गुलजार गुलाबी चैनी ब्राह्मण आपल्या नाशिकच्या घाटदार भांड्याच्या घासून ठेवलेल्या जोडांच्या लकाकीकडे; व गुलाबी झाकीच्या धोत्रांच्या करून ठेवलेल्या घड्यांकडे, आणि आपल्या कसलेल्या रुंद छातीवरून सोडलेल्या शुभ्र यज्ञोपवितांकडेस पहात पहात संध्या करीत आहेत; कित्येक आपल्या स्नानांतून, पाहणाराच्या नेत्रास आपल्या तेजोमय कांतीनें दिपविणाऱ्या जलपूरित गडवे, तांबे, मनकर्णीकांस लाविलेले आंकडे धरून व आपल्या लांब तुळतुळीत शेंड्यांच्या अग्रास गांठी मारून, त्याखालीं आपली शिरें आच्छादून, गुलाबी धोत्राच्या घड्या बगलेंत मारून, गळ्यांतून उपवितीप्रमाणें स्वच्छ यज्ञोपावितांचा गेठा देऊन, मुखानें हळू हळू कांहीं ह्मणत मानेस हिसका मारीत मोठ्या ऐटीनें घरीं परत चालले आहेत; इकडे स्त्रियांच्या मेळ्यांतही वेणीफणी करून, किंवा आवडीप्रमाणें तऱ्हेतऱ्हेचे अंबाडे घालून आलेल्या स्त्रियांपैकीं कित्येक अंगें धुवून आपल्यास जन्मजन्मांतरीं अखंड सौभाग्य मिळविण्याच्या संकल्पानें सौभाग्य द्रव्यादिकेंकरून श्रीगंगेची पूजा करीत आहेत; कित्येक गंगेंत उभ्या राहून पदरास चोळ्यांच्या गांठी मारून, अंगावरील पदर नीटनेटकेपणानें राखीत होतसात्या आपल्या सौभाग्यदर्शक केशकलापांत गंगोदकाचा प्रवेश न व्हावा ह्मणून मोठ्या बेतानें गळ्याखालून स्नानें करीत आहेत; कित्येक थबथबीत वस्त्रांनिशीं बाहेर येऊन घाट्याजवळ ठेविलेल्या आसनांतील धूतवस्त्रें परिधान करीत आहेत. कित्येक पूजापात्रें व सुशोभित झाऱ्या हातीं घेऊन, परत देवदर्शनें करीत करीत चालल्या आहेत. कित्येक शिरीं गंगोदकानें भरलेले कुंभ व उजव्या हातीं भरलेल्या गडव्या तांब्यांच्या गळ्यास अडकविलेल्या कड्यांस धरून, डाव्या कंबरेवर धुण्याची मोट घेऊन मोठ्या कष्टानें हळू हळू चालल्या आहेत. अशा गर्दीत मुलांची गंगेंत उड्या मारून पोहण्याची धूम चालली आहे, त्यामुळें गंगोदकाचे शिंतोडे सभोंवती असलेल्या स्त्रीपुरुषांच्या अंगावर उडत असल्यामुळें ते त्यास रागाच्या शब्दांनीं दटावीत आहेत; मधून मधून घाटाघाटांनीं संन्याश्यांचा नारायण नाम घोष ऐकूं येत आहे. नवीन आलेल्या यात्रेकरूंची त्यांच्या त्यांच्या उपाध्यासह रामकुंडावर तीर्थविधिसाठीं गर्दी होऊन, कोणी यात्रेकरू गंगाभेट तीर्थक्षौर विधि आटोपून आपल्या पत्नीपरिवारासह गंगेंत उभे राहून स्नानाचे तयारीत असतां "महाराज हातांत पाणी द्या; आचमन करा." असे बोलून "गंगागंगेति यो

ब्रूयात् " इत्यादि मंत्रोच्चारानें संकल्प सांगण्याचा उपाध्यायाचा एकच कडाका उडून राहिला आहे; कोणी स्नानें करून दुसरीं वस्त्रें परिधान करून मुक्त वेळ उपाध्ये यांचे जवळून मागून घेत आहेत; कित्येक गंगाभेट पूजन करीत आहेत; कित्येक पहिलें स्नान करून त्या थबथबलेल्या वस्त्रांसह क्षौर करवीत आहेत; व कित्येकांच्या डोकीस नाव्ह्याचा पट्टा ओढला जाऊन ते आपली स्मश्रु केव्हां होईल ह्मणून वाट पहात बसले आहेत; कित्येक तेथील विधि आटोपून आपल्या घरीं परत जाण्यास निघाले आहेत. असा सर्वत्र गलबला व देखावा पाहून नवीन पाहणारांचे चित्तास तर फारच चमत्कार वाटून आल्हाद होतो. दोनप्रहरीं दोन तीन तास मात्र गंगा अम्मळ विसावलीशी दिसते. पुढें अस्तमानीं दुतर्फा घाटावरून सायंसंध्येस बसलेले संन्याशी व कर्मनिष्ठ ब्राह्मणांचे मेळे; व आपल्या ऐटीच्या पोषाखांसह हातांतून वांकड्या काठ्यांनिशीं मोंकळ्या हवा खाण्यासाठीं सहल करीत असलेल्या, व कित्येक घाटाघाटांच्या पायऱ्या-पायऱ्यांनीं चैनी लोकांच्या बसलेल्या झुंडी सुवासिक फुलांच्या वेण्या व माला विकत घेणाऱ्या स्त्रीपुरुषांची गर्दी, व किटसन लाइटच्या प्रकाशांत असलेलीं हॉटेलें व त्यांतील भजांदिकांच्या वासानें उल्हसून जाणारे ब्राह्मणेतर लोक, पानपट्टी, सोडालिंबू, उंसाचा रस, घेणारांची धामधूम इत्यादिकेंकरून गंगा अगदीं गजबजून शोभायमान दिसते. असा हा मनोरम देखावा पाहून कोणा पाहणारास आनंद होणार नाही ? एकंदरीनें येथील गंगाकांठची दुतर्फा वसलेली वस्ती, बांधिलेलीं देवळें, घाट, धर्मशाळा आणि कुंडें ह्यांहींकरून उभय क्षेत्रें जशी शोभा देत आहेत, तशी शोभा साऱ्या हिंदुस्थानांत पाहतां कोणत्याही अन्य क्षेत्रीं आढळून येत नाहीं, अशी सर्वत्र ख्याति आहे.

पावसाळ्यांत पाणी फार असल्यानें फिरण्याची सोय नसते. जेव्हां पूर येतो त्यावेळीं पोहोणारांची मौज पाहण्यासाठीं प्रेक्षकांची गंगेच्या कोठावरून बरीच गर्दी होते. मोठाल्या भोपळ्याच्या सांगडीवर वसून कांहीं इसम पुरांत निघतात व कांहीं इसम त्यांच्या घोड्यास ( सांगडीस ) धरून पोंहत जात असतात. हें मोठें धारिष्टाचें काम असल्यानें महापुरांत उडी घालणारे लोक थोडे, व नवीन फारसे दिसत नाहींत. त्यामुळे प्रेक्षकांचीच गर्दी पुष्कळ. अशावेळीं श्रीगंगेस स्वशक्त्यनुसार वायन, नारळ, साडीचोळी, खण, वगैरे अर्पण करितात. दान करितात. सुवासिनी स्त्रियांस गंगेवरच खण, नारळ, लुगडीं, वाटणारेही धनिक गृहस्थ मधून मधून दृष्टिगोचर होतात. नाशिक क्षेत्रीं कोणी कितीही नास्तिक मनुष्य आला व श्रीगंगास्नान व श्रीरामदर्शन घेतल्यावर त्याच्या मनांत धर्मजागृति व अंशतः श्रद्धा उत्पन्न होणार नाहीं, असें क्वचितच दृष्टिस पडेल.

---

१८७२

# भाग ६ वा.

## सांप्रतची स्थिति.

नाशिक पंचवटी क्षेत्रांत हल्लीं बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत. धार्मिक, राजकीय चळवळी जोरानें चालू आहेत. स्वराज्यनिदर्शक म्युनिसिपालिटी व लोकलबोर्ड हीं नाशिक जिल्हा ठिकाण असल्यानें येथें बरेच दिवसापासून आहेत, व दोन्हीं संस्थांस प्रेसिडेंटचा हक्क लोकनियुक्त सभासदास मिळालेला आहे. दोन्हीं ठिकाणीं चीफूऑफिसर आहेत. मु० चिफूऑफिसरांची नेमणूक झाल्यापासून गांवांत स्वच्छतेचें मान उत्तम रीतीनें वाढलें आहे. मूळची नाशिकची हवा समशीतोष्ण असून समुद्रसपाटीपासून २००० फूट उंचीवर आहे. गांवांत घरें ४५००. लोकसंख्या सुमारें ३५००० आहे. घरोघरीं विहिरी आहेत. हल्लीं म्युनिसिपालिटीनें गंगेंत विहिरी बांधून गांवांत नळ आणिल्यानें लोकांस अतीशय सुख झालें आहे. नळास पाणी मुबलक असल्यानें ठिकठिकाणीं हौद व कारंजीं बांधलीं आहेत. शिवाय यात्रा व उत्सवप्रसंगीं गंगेचे पटांगणावर यात्रेकरूंच्या उपयोगासाठीं तूर्तातूर्त नळ उभे केले जातात. त्यामुळें गंगेचें पाणी पिऊन कॉलरा वगैरे रोग व सांथी येत असत; त्यांचें भय अगदीं नाहींसें झालें आहे.

**कर**—मुनिसिपालिटीकडून दर यात्रेकऱ्यावर चार आणे कर बसविला आहे. प्रसंगविशेषीं तो कदाचित् जास्त वाढविण्यांत येईल. तत्राप तो यात्रेकरूंच्या सोईसाठीं होतांहोईल तों उपभोगास आणण्याची तजवीज झाली पाहिजे.

**बाजार**—सकाळचा भाजीबाजार पंचवटींत पेशव्यांच्या पटांगणावर आठ महिनें भरतो. व मोठे बाजार बुधवारीं व शनिवारीं दुपारीं गंगेंच्या वाळवंटांत आठ महिनें भरतात. पावसाळ्यांत पंचवटींत सकाळीं लहानशी गुजरी भरत असून, नाशिकांत भद्रकाळीचे देवळानजीक विजयानंद थिएटरसमोर नवीन मंडईत सकाळचा भाजीबाजार भरतो. येथील भाजीपाला, फळफळावळ व द्राक्षें नामांकित आहेत. त्याचप्रमाणें चांदीचीं भांडीं येथें तयार होत असून तांब्यापितळेचीं भांडी करणारे तांबट लोकांचीं वस्ती बरीच असून ते लोक उत्तम कारागीर आहेत. पुलावर ह्मणजे पेशव्यांच्या वाड्यासमोर सराफ पेठ व कापडाची पेठ असून, डावे बाजूस बोहरी गल्ली आहे. कालमानाप्रमाणें व्यापार चांगला चालतो.

**पूल**—नाशिकांतून पंचवटींत जाण्यासाठीं फरशा गंगेस बांधलेल्या आहेत. त्यांस "सांडवे" असें ह्मणतात. हे गंगेच्या भोंवताली असलेल्या पटांगणाच्या सपाटीचे असल्यानें पावसाळ्यांत पंचवटींत जाणें धोक्याचें असे. कै० रा० ब० काशिनाथ महादेव थत्ते हे नाशिकास डिं० डे० कलेक्टर असतां, त्यांनीं फार खटपटीनें पैसा गोळा करून सुंदरनारायणपासून पंचवटींतील विठोबाच्या देवळापर्यंत पूल बांधला आहे. त्यामुळें पावसाळयांतील गैरसोय नाहींशी झाली आहे.

**शाळा**—नाशिकांत एक सरकारी हायस्कूल, न्यू इंग्लिश स्कूल व मिशनरी स्कूल अशा तीन इंग्रजी शाळा असून, ३ मराठी, २ मुसलमानी शाळा आहेत. तसेंच १ संस्कृत शाळा व १ वेदशाळा आहे. येथील सरकारी हायस्कूलांत मुलींची शिकण्याची सोय झाली आहे. मुलीकरितां स्वतंत्र इंग्रजी शाळा काढण्याचा सरकारचा विचार झाला आहे, व ती योजना लवकरच अमलांत येईल. असें समजतें. शाळांत जाणऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिणींची संख्या सुमारें ४५०० आहे.

**रस्ते**—पेशवाईत सर्व रस्ते फरशीचे असून ते अद्याप जुन्या वस्तींत कायम आहेत. रहदारीच्या रस्त्यावरील फरशी हल्लीं काढून टाकून तेथें सडका केल्या आहेत. त्यावरून मोटारी, तांगे, गाड्या चालतात. गांवांतील हवा जुन्या बांधणीच्या घरामुळें फार कोंदट असे. व वरचेवर रोगाच्या सांथी उद्भवत. अलीकडे म्युनिसिपल प्रेसिडेंट श्रीयुत वि. गं. केतकर व चिफ्ऑफिसर रा. वि. ग. रेडे यांनीं आपल्या अमदानींत शहरांतील बरेच रस्ते पूर्वपश्चिम रुंद केले, त्यामुळें हवा मोकळी वाहूं लागून कोंदटपणा नाहींसा झाला. नळाचें पाणी आल्यानें हवापाण्याचा उत्तम पुरवठा झाला व कॉलरा वगैरे सांथी येणें बंदच झाले. याशिवाय नवीन मार्कीट झालें. इतर गांवांत स्वच्छता वाढली. गांवांतील मैला पहांटेस नेण्याची चाल येथें आहे. मुंबई धर्तीवर इमारती होऊं लागल्या. शिक्षणाचा प्रसार अधिक झाला.

**दवाखाने**—सिविल हॉस्पिटल मोठें विस्तृत आहे. शिवाय ४।५ खाजगी डॉक्टर आहेत. पंचवटींत मिशनरीचा बायकाकरितां दवाखाना आहे. तसेंच गंगाकाठीं नेन्सीबाई धर्मार्थ दवाखाना आहे. नेटिव वैद्यांचे ४।५ दवाखाने आहेत. यांत १ कुमारीताई खर्डीकर या स्त्रीवैद्य आहेत.

**तालमी**—पूर्वी नाशकास पुष्कळ तालमी असून, १०।१५ चांगल्या नांवाजलेल्या होत्या. वेळोवेळीं कुस्त्या करवीत असत व कुस्ती जिंकणारांस बक्षिसें वाटीत असत. त्यावेळीं हायस्कूलांतील विद्यार्थीसुद्धां कुस्त्या जिंकीत असत. तालमीच्या शोकामुळें हल्याच्या टकरी, लेजीम खेळणें, आटापाट्या, खोचे खेळ, शिमग्यांत तमासे,

आखाडे, बोद्दाडे, रंगपंचमीस रंगाच्या गाड्या, या सर्व खेळांची भरभराट होती. हल्लींच्या शिक्षणानें लहानथोरांची प्रवृत्ति वरील मर्दानी खेळ खेळण्याकडे नसून गंजिफा, बिझीक वगैरे पत्त्यांचें डाव, फारवर टेनिस् फुटबाल या पलिकडे तिची मजल जात नाहीं. सकाळीं गंगेवर स्नान करून नमस्कार घालण्याची गोष्ट दूरच; मग जोरजोडींचें नांव कशाला? परिस्थितीच बदललेली असल्यानें विद्यार्थी किंवा तरुण मंडळीचा यांत दोष नाहीं. परंतु गांवचे पुढारी मंडळींनीं भावी पिढीच्या शरीरसामर्थ्य वृद्धिकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे. स्वराज्य मिळवून तें चिरस्थायी होण्यास नुसती तोंडची विद्वत्ता कधीं उपयोगी पडणार नाहीं. धर्मश्रद्धा व कार्यक्षमता, हीं तरुण पिढींत उत्पन्न होतील अशी शिक्षणाची दिशा पाहिजे. नाहीं तर पुढल्या पिढींत कर्तृत्वानंतर राहोच; पण वक्ते तरी निपजतील कीं नाहीं ही शंकाच आहे.

**स्मशान**—हें गंगाप्रवाहाच्या खालीं दक्षिणेस गांवाच्या शेवटीं आहे. येथें धर्मशाळा बांधलेली असून पावसाळ्यांत व उन्हाळ्यांत तेथें बसण्यास उपयोग होतो. उत्तरक्रिया करण्यासाठीं नाशिकसारखी सोय सर्व हिंदुस्थानांत नाहीं; असें यात्रेकरू सांगतात. मुरलीधराचे देवळानजीक कोटावर ( गंगाकाठीं ) धर्मशाळा बांधलेली असून त्याठिकाणीं काहीं ब्राह्मण असतात; त्यांस पैसे देऊन व त्यांजकडून सर्व तयारी गंध, फुलें, तुळशीतील पिंड वगैरे गाडग्यामडक्यासुद्धां थोडक्यांत होते. क्रिया करणारानें फक्त जाऊन बसावें, व भटजी सांगेल ती क्रिया करावी. अशा सोयीमुळें लांबचे लोक येऊन येथें स्वशक्त्यनुसार पैसा खर्च करून मृतासेष्टाची क्रिया करून घरीं परत जातात. याप्रमाणें बहुशा पारावर गर्दी असते. शाहापूरचे रा. रा. गोडबोले यांनीं या धर्मशाळेंत शाहाबादी फरशी केली आहे.

**सरकारी ऑफिसें**—नाशिक हें जिल्ह्याचें ठिकाण असल्यानें येथें रेविन्यु-कचेऱ्या, दिवाणी कोर्टें, असून त्या इमारती गांवच्या पश्चिमभागास बांधिलेल्या आहेत. जवळच हायस्कूलची इमारत प्रेक्षणीय आहे. आसपास वकील लोकांचे नवीन तऱ्हेचे बंगले उभारलेले असून नवीन इमारती होत आहेत. २ क्लब आहेत. एडवर्ड बादशहांचा स्मारक फंड सर्व जिल्ह्यांत गोळा केला. त्यांतील सुमारें २५००० रुपये खर्च करून "किंग एडवर्ड मेमोरिअल क्लब" बांधला आहे. या क्लबचे अध्यक्ष कलेक्टर असून बहुतेक सरकारी अधिकारी या क्लबाचे सभासद असतात. दूसरा क्लब "किंग जार्ज कोरोनेशन दरबार क्लब" या नांवाचा आहे. हा खासगी वर्गणीनें बांधलेला असून यांत वकील, कांहीं सरकारी अधिकारी, हायस्कूलांतील शिक्षक, व्यापारी, सुखवस्तु गृहस्थ वगैरे मंडळी सभासद आहेत.

गांवांत पोष्ट व तार ऑफिस असून गांवाबाहेरही जनरल पोष्ट व तार ऑफिस आहे. शिवाय मुख्यठिकाणीं पोष्टाच्या पेट्या लावलेल्या आहेत.

वरील ऑफिसांच्या पश्चिमेस १ मैलावर पोलिस ट्रेनिंग स्कूल आहे. तेथें लहानसा दवाखाना आहे.

**वाचनालयें:—**

१. जनरल लायब्ररी फार वर्षांपासून आहे. वर्गणींदारांची संख्या जरी पुष्कळ आहे, तरी उत्पन्नाचें मान कमी आहे. या लायब्ररीस कायमची इमारत नाहीं. हल्लींची जागा लवकरच मोकळी करावी लागणार असल्यानें कायम इमारतीची व्यवस्था करणें जरूर आहे. श्री० सयाजीरावमहाराज सरकार यांचेकडून या इमारतीसाठीं देणगी मिळणार असल्याचें समजतें.

२. केतकर टाऊन हॉलमध्यें जस्टिस रानडे मोफत वाचनालय आहे. मुंबईचे प्रसिद्ध कै. शेट दामोदरदास सुखडवाला यांनीं या वाचनालयासाठीं १५०० रुपयांची देणगी दिली आहे. कै. रतनजी देसाई हायकोर्ट वकील, मुंबई यांनीं नाशिक येथें मोफत वाचनालय स्थापण्याचे कामीं ५००० रुपये आपले मिळकतींतून द्यावें, असें मृत्युपत्रांत लिहून ठेविलें आहे. त्याप्रमाणें ही रकमही या मोफत वाचनालयास मिळाली आहे. हें वाचनालय रजिष्टर झालें असल्यानें विद्यार्थी याचा फायदा विशेष घेतात. या वाचनालयांत पुस्तकसंग्रह ३००० चे वर आहे.

३. कै. सौ. सत्यभामाबाई रानडे यांचे स्मरणार्थ त्यांचे पति रा. रानडे पैसाफंडाचे स्वयंसेवक यांनीं एक मोफत वाचनालय सुरू केलें आहे.

४. पंचवटींत बाई जेठाबाई यांचें धर्मशाळेंत मोफत वाचनालय बरेच दिवसापासून आहे.

**धर्मशाळा, अन्नछत्रें**—नाशिक पंचवटींत धर्मशाळा पुष्कळ आहेत. परंतु त्या मुंबईच्या गुजराथी भाटे वगैरे लोकांनीं बांधल्या असल्यानें त्यांचा इतर लोकांस उपयोग होत नाहीं.

त्रिभुवनदास ठाकूरदास मुंबईचे खत्री यांनीं पंचवटींत संन्याशी लोकांसाठीं एक अन्नछत्र घातलें आहे. तें बरेंच दिवस चाललें असून त्यांत प्रत्येक संन्याशास दुपारीं एक वेळ भोजन मिळतें.

**रहाडी—**शिमग्यांत रंगपंचमीचे दिवशीं रहाडी उकरून त्यांत पाणी भरून आंत गुलाल वगैरे रंग घालतात. मग त्यांत उड्या घालतात. रहाडी ७।८ हात रुंद लांब असून १ पुरुष खोल असतात. दुसरे दिवशीं त्या मातीनें बुजवून टाकतात.

**तमाशे**--१०।१५ वर्षांपूर्वी नाशकास तमाशे फार चांगले होत असत. रंगपंचमीच्या दिवशीं रंगाच्या गाड्या १५०।२०० निघून सर्व गावांत मिरवीत रंग खेळण्याचा प्रघात होता. अलीकडे तमाशे नाहींतच; व गाड्या फार तर २०।२५ निघतात.

**उत्सव**--पंचवटींत श्रीरामाचा चैत्र शु. १ पासून शु. ९ पर्यंत उत्सव व शु. ११ स रथोत्सव होतो, तेव्हां मोठी यात्रा भरते. नाशिकांत श्रीबालाजीचा आश्विन व. १ पासून १० पावेतों. सुंदरनारायणाचा कार्तीक शु. १ ते शु. १० पावेतों उत्साह होऊन शु. १२ स दोन्हीं उत्सवाबद्दल गांव प्रयोजन होतें. श्रीबालाजी हे सर्वांत श्रीमंत देव आहेत. या प्रयोजनास भंडारा असें ह्मणतात.

फाल्गुन व. त सादळशाचा मोठा उत्सव भरतो. मोहरमचा उत्सवही थाटदार होतो.

अक्षतृतिया व संक्रांतीची कर या दोन दिवसांचे मेळे बायकांचे आहेत. तेही पाहण्यासारखे असतात. शिराळशेटचा एक मेळा भरतो.

**छापखाने**--नाशिकास ४ छापखाने आहेत. परंतु त्यांतून एकही वृत्तपत्र किंवा मासिक निघत नाहीं, ही मोठी उणीव आहे. कधीं नाहींशी होईल ती होवो.

**दूध**--पंचवटींतील पांजरापोळ मुंबईच्या भाटेलोकांनीं चालविला आहे. येथें दूध चांगलें मिळतें. त्याचप्रमाणें त्रिंबकदरवाजाजवळ भातकुटे मुसलमान लोक दूध विकण्यास सकाळ संध्याकाळ बसतात. यांच्या दुधात लबाडी होत नाहीं अशी ख्याति आहे.

**पाहण्याचीं ठिकाणें**--पेशव्यांचा वाडा, गंगेचा पूल, नकशीकामाचे वाडे, टॉऊनहाल, गंगेवरील नळाचें काम, सितागुंफा, तपोवन, गंगापुरची दुग्धस्थळी व लेणी हीं पाहण्यासारखीं ठिकाणें आहेत. येथून त्र्यंबकास व सप्तशृंग गडावरील देवीस जाण्याचे मार्ग आहेत. गड नाशिकाहून १३ कोस आहे.

**विद्वत्ता**--येथें वैदिक, शास्त्री, हरिदास, जोतिषी, वैद्य, अग्निहोत्री यांचा पुष्कळ भरणा होता व तसा त्यांचा लौकिकही काशीपावेतों होता. हल्लीं फारसे नवीन होत नाहींत. कारण राजाश्रय नाहीं; लोकाश्रयही फार नाहीं.

हल्लींच्या प्रमुख मंडळींचीं नांवें खालीं दिलीं आहेत:--

**वैदिक ऋग्वेदी.**

वामनभट दांडेकर. विनायकभट फणसे.
गोविंदभट आठवले. महादेवभट ह्मसकर.

वे० परशरामभट दांडेकर.
,, पुरुषोत्तमभट पाटणकर.
,, दाजी मराठे.
,, बाबू सोमण.

वे० गणेशभट साने.
,, शंकरदिक्षीत जोगळेकर.
,, दामू आप्पा मराठे.

वे० आनंददिक्षीत शेजवळकर.
,, विष्णुभट चांदोरकर.

## देश.

वे० बाबुदिक्षीत भडकमकर.
,, सदाशिवभट गरूड.

## हिरण्यकेशीय.

वे० चिंतुदिक्षीत मनोहर.
,, गोविंददिक्षीत मनोहर.
,, अण्णाभट साठे.
,, विश्वनाथभट साठे.
,, आप्पाभट वैशंपायन.

वे० वामनभट दाते.
,, तात्या मोडक.
,, दामूअण्णा डोंगरे.
,, बाबुदिक्षित लेले.
,, गोविंददिक्षीत बापट.

## माध्यंदिन.

वे. नारायण देव. घनपाठी.
,, विनायक देव. ,,
,, शंकर दिक्षीत शौचे ,,
,, शंकरभट क्षेमकल्याणी. ,,
,, त्र्यंबक दाजी गायधनी. ,,
,, गणेशभट भानवशे. ,,
,, गणेशभट शुक्ल. ,,
,, दामोदरभट गर्गे. ,,
,, अनंतभट जुन्नरकर. ,,
,, मुरलीधर दिक्षीत शौचे. ,,
,, निळकंठ जोशी डिंगरें.
,, कण्व गोविंदभट जागदे.

वे. लक्ष्मण दिक्षीत शौचे. वेदपाठी.
,, काका गर्गे.
,, रंगभट गर्गे.
,, बापू दिक्षीत.
,, त्रिंबक दिक्षीत शौचे,
,, बाळोबा दिक्षीत. पंचवटी.
,, बापू दिक्षीत. ,,
,, नारायण दिक्षीत. ,,
,, उमाकांत गर्गे,
,, नाना गर्गे.
,, मैत्रायणी यशवंतभट पुराणीक.

## शास्त्री.

वे० हरीशास्त्री गर्गे. *
,, रामशास्त्री वैद्य. *
,, सितारामशास्त्री महाशब्दे. *

वे० कृष्णशास्त्री पद्मनाभे.
,, भालचंद्रशास्त्री पद्मनाभे.
,, दामूशास्त्री पाराशरे.

* यांचा लौकीक काशी क्षेत्रापावेतों आहे.

वे० लक्ष्मणशास्त्री गर्गे.
,, पुरुषोत्तमशास्त्री गर्गे.

विष्णुजोशी रहाळकर.
दामूजोशी गायधनी.
दामूजोशी फणशे.
अनंतजोशी आडगांवकर.

थोंडभट विश्वामित्र
वासुदेव दिक्षीत खेडकर.
दाजी भाऊ हिंगणे.
अण्णा भातवडकर.
कृष्णंभट भातवडकर.
गोपाळभट महाशब्दे.
सावळारामभट खेडकर.
बापू पैठणकर.

भय्या शारंगपाणी.

अण्णाशास्त्री वारे.
लक्ष्मणदिक्षीत शौचे.
काका गर्गे.

वै० कृष्णाशास्त्री देवधर.
,, गोपीनाथशास्त्री दाते.

भडजीशास्त्री शुक्ल.
केशवशास्त्री गायधनी.
विष्णुशास्त्री पुराणीक.
गोविंदाचार्य मांडवगणे.
नारायणशास्त्री गायधनी.

वे० अंबादासशास्त्री वारे.

## ज्योतिषी.

सितारामजोशी घोलप.
बाबशास्त्री फडके.
गणेश दामोदर दिक्षित. शाळामास्तर सायखेडें

## याज्ञीक ऋ०

अनंताचार्य मांडवगेकर.
पिळंभट काशीकर.
सदू भाऊ पोळ.
भालचंद्रभट हिंगणे.
सखारामभट जामखेडकर.
सदाशिवजोशी कोळथेकर.
गोविंदभट वझे.
विष्णुभट पोळ.

### हिर०

चिंतामणभट अभ्यंकर.

### यजु०

मोहनीराज दिक्षीत.
रघुनाथदिक्षीत शौचे.

## वैद्य.

वै० घारुअण्णा रानडे.

## पुराणीक.

एकनाथशास्त्री शुक्ल.
दत्तूशास्त्री कलमकर.
कृष्णाबोवा धोडपकर.
नानाभाई भवानीशंकर तळेजे गुजराथी.

## कथेकरी हरिदास,

नारायणबोवा गोसावी. पंचवटी.
बाबू साकोळकर. पंचवटी.
गोपाळभट पैठणकर. नाशिक.
माधवबोवा गोसावी. नाशिक.
श्रीधरशास्त्री सिन्नरकर. पंचवटी.

नाशिकची वकील मंडळी एकमेकांशीं आपले धंद्यांत फारच सज्जनपणानें वागतात असा बहूत दिवसांचा लौकिक आहे. त्याचप्रमाणें धार्मिक, सामाजिक व राजकीय विषयांत एकजुटीनें वागून काम पार पाडण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. रा. बाबासाहेब खरे, रा. पाटणकर, रा. अकूत, रा केतकर, रा. गद्रे, रा. प्रधान, वगैरे जुनी वकीलमंडळी गांवचे पुढारी जीव प्राण आहेत. गांवचे लोकांची एकी चांगली असल्यानें परस्परांची सहकार्यता होते. नाशकास हवा, पाणी, जागा, क्षेत्र, माहात्म्य, हीं अनुकूळ असल्यानें येथें कॉलेज काढण्याचा नाशिककरांचा मनोदय आहे. व खटपट चालू आहे स्वराज्यांतर्गत सुधारणा लवकरच अमलांत येतील, त्यावेळीं राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न पुढें ठेऊन राष्ट्रकार्याला उपयोगी पडणारे विद्यार्थी तयार होतील. अशा प्रकारचें शिक्षण देणाऱ्या शाळा, हायस्कूल व कॉलेज निर्माण व्हावें: अशी प्रत्येक नाशिककरांची इच्छा आहे. त्याचप्रमाणें प्राचीन धंदे, विद्या, यांचा उत्कर्ष होऊन लोक संपन्न व्हावें असाही हेतु आहे. हें सर्व श्रीरामकृपेनें पूर्ण होवो.

गोविंद नारायणशास्त्री।

# नाशिक पंचवटी येथील मोठीं देवालयें, घाट, धर्मशाळा, ह्यांचें संक्षिप्त वर्णन.

| बांधणाराचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
|---|---|---|---|
| गंगाधर यशवंत चंद्रचूड. ( होळकरांचे दिवाण. ) | सुंदरनारायणाचें देवालय, घाट, धनुष्यकुंड, रामकुंड, व सीताकुंड. | १७५६ | खर्च १० लक्ष रुपये. मोठें मजबूत. हल्लीं नादुरुस्त आहे. खर्चास ८४२ रु. नेमणूक आहे. धार्मिक व श्रीमान् गृहस्थांनीं इकडे लक्ष पुरवावें. |
| गणपतराव मुठे व गांवकरी मंडळी. | यशवंतराव महाराज समाधी. | १८८७ | गंगाकांठीं मजबूत बांधिली आहे. जास्त माहिती भाग ५ पहा. |
| लक्ष्मण शंकर राजेबहाद्दर. | निळकंठेश्वर घाट व कुंड | १७४७ | खर्च १ लक्ष रुपये. नेमणूक १९३ रुपये आहे. |
| देवराज महादेव हिंगणे. | गोराराम मंदीर, पायऱ्या, घाट वाडा, पंचवटींत विष्णु मंदीर. | १७८२ | मंदीरांत जाण्यास ४० पायऱ्या लागतात. खर्च सुमारें १ लक्ष. देवास हिंगण्यांकडून कांहीं नेमणूक आहे. |
| कृष्णदास परांजपे. | तारकेश्वर, घाट व पटांगण. | १७८० | रामगयेवर. |
| बापाजी बोवा. | बालाजी मंदीर. | १७७१ | नवरात्रांत मोठा उत्सव होतो. [ जास्त माहिती भाग ५ पहा. |

| बांधणारांचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
|---|---|---|---|
| त्रिंबकराव अमृतेश्वर पेठे. | तिळभांडेश्वर. | १७६३ | खर्च २५ हजार रु. नेमणूक ३८९ रु. आहे. |
| गणपतराव दिक्षीत पटवर्धन | भद्रकाळी. | १७९० | खर्च २५ हजार रुपये. नेमणूक २२९ रु. आहे. नवरात्रांत मोठा उत्साव असतो. कांहीं संकट आल्यास मळी काढतात. त्याचा प्रभाव तावडतोब देतो. |
| म्यु. कमेटी, लोकलबोर्ड, सरकार व रयत-वर्गणी. | गंगेचा पूल. | १८९५ | खर्च १॥ लक्ष रुपये. सर्व पुढाकार काशीनाथ महादेव थत्ते यांनीं घेतला. या पुलास व्हिक्टोरीया ब्रिज ह्मणतात. पूल बांधण्यापूर्वी नावेंत बसून पलीकडे जावें लागे. |
| महादजी गोविंद काकीर्डे. | विठ्ठलमंदीर, लक्ष्मणकुंड. | १७५५ | खर्च ५ हजार. हल्लीं पुजेस ४५८ रु. नेमणूक आहे. |
| १ कृष्णाजी पाटील विश्वासराव निरंतर.<br>२ मोरो आबाजी सोमण.<br>३ खेमजी असरजी शेट.<br>४ केरुजी धिरुजी पवार. | कपालेश्वर. | ११०० ते १९०३ | [ भाग ५ पहा. ] |

| बांधणाराचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
| --- | --- | --- | --- |
| उमाबाई महाराज. | महाराज राममंदीर, कुंड. | १८६८ | श्रीराममूर्तीपुढें तात्या महाराज कोल्हापुरचे राजगुरु ह्यांची समाधी आहे. |
| गणपतराव भागवत. | पाताळेश्वर महादेव. | १७७८ | हें काम पाषाणमय असून मजबूत आहे. |
| रघुनाथभटजी कारटे. | कारव्या मारुती. | १८२८ | ही मूर्ति सुमारें दहा फूट उंच असून तिच्या स्नान पूजेसाठीं दोहोंबाजूस जिने करून ठेविले आहेत. येथें नेहमीं गोसाव्यांची वस्ती असते. |
| सदाशिवभट वीन मुरार दिक्षीत. | नृसिंहमंदीर. | १८६८ ते १७७८ | ह्याटे ह्यांनीं सखारामबोवा गिरधारी ह्यांस बक्षिस दिलें. |
| अहिल्याबाई होळकरीण. | राम व महादेव हीं मंदिरें, यास लागून धर्मशाळा, घाट, कुंड. | | अहल्याई ही महान् पतिव्रता साध्वी होऊन गेली, इचें प्रत्येक क्षेत्रीं कांहीं तरी आहेच, त्याप्रमाणें येथेंही असून या श्रीरामास सालिना ३६० रु. नेमणूक आहे. हीं कामें गंगाकिनाऱ्यास मोठीं मजबूत व सुरेख अशीं आहेत. खर्च २ लक्ष रुपये. |

| बांधणाराचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
|---|---|---|---|
| बाळाजीपंत नातु पुणेकर. नारायण यमाजी पोतनीस [ शिंद्याचे कारभारी. ] | रघुनाथ भटजीचें शिवालय सभामंडप, घाट. | १८२३<br>१८४५ | देऊळ मजबूत, नातूकडून ४० रु. व शिंद्याकडून २०० रु. नेमणूक आहे सभामंडप मोठा व मजबूत आहे. |
| नारोशंकर राजेबहाद्दर. | रामेश्वर व त्यापुढील पटांगण व घाट. | १७४७ ते १७७० | [ जास्त माहिती भाग ५ पहा. ] |
| खंडेराव त्र्यंबक ओढेकर. | श्रीराममंदीर. | १७७८ ते १७९० | [ जास्त माहिती भाग ५ पहा. ] |
| मोरो आबाजी सोमण. | [ १ ] सप्तशृंगच्या देवीचा तांदळा. [ प्रतिमा. ]<br>[ २ ] बाणेश्वर. | १८८४ | [ १ ] राजेबहाद्दर यांनीं बांधलेल्या कामाचा जीर्णोद्धार केला.<br>[ २ ] या देवावर आलय नव्हतें. तें नवीन बांधिलें. |
| गणेश विठ्ठल किबे. | केशवमहाराजाचा मठ व रामकुंडावरील पूर्वाभिमुख धर्मशाळा. | १८४७ | केशवमहाराज हे प्रसिद्ध साधु इ. स. १८४६ त समाधिस्त झाले. |
| गणेश रघुनाथ मुळे. | मैत्रायण्यांचें श्रीराममंदीर. | १८६५ | या मंदिराचें सर्व काम लांकडी असून सर्व जमीन संगमरवरी पाषाणमय आहे. येथें चौघडा असून श्रीरामाच्या |

| बांधणाराचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
| --- | --- | --- | --- |
| उमाबाई महाराज. | महाराज राममंदीर, कुंड. | १८६८ | श्रीराममूर्तीपुढें ताल्या महाराज कोल्हापुरचे राजगुरु ह्यांची समाधी आहे. |
| गणपतराव भागवत. | पाताळेश्वर महादेव. | १७७८ | हें काम पाषाणमय असून मजबूत आहे. |
| रघुनाथभटजी कारटे. | कारट्या मारुती. | १८२८ | ही मूर्ति सुमारें दहा फूट उंच असून तिच्या स्नान पूजेसाठीं दोहोंबाजूस जिने करून ठेविले आहेत. येथें नेहमीं गोसाव्यांची वस्ती असते. |
| सदाशिवभट बीन मुरार दिक्षीत. | नृसिंहमंदीर. | १८६८ ते १७७८ | इयाटे ह्यांनीं सखारामबोवा गिरधारी ह्यांस बक्षिस दिलें. |
| अहिल्याबाई होळकरीण. | राम व महादेव हीं मंदिरें, यास लागून धर्मशाळा, घाट, कुंड. | | अहल्याबाई ही महान् पतिव्रता साध्वी होऊन गेली, इचें प्रत्येक क्षेत्रीं कांहीं तरी आहेच, त्याप्रमाणें येथेंही असून या श्रीरामास सालिना ३६० रु. नेमणूक आहे. हीं कामें गंगाकिनाऱ्यास मोठीं मजबूत व सुरेख अशीं आहेत. खर्च २ लक्ष रुपये. |

| बांधणाराचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
|---|---|---|---|
| बाळाजीपंत नातु पुणेकर. नारायण यमाजी पोतनीस [ शिंद्याचे कारभारी. ] | रघुनाथ भटजींचें शिवालय सभामंडप, घाट. | १८२३ १८४५ | देऊळ मजबूत, नातूकडून ४० रु. व शिंद्याकडून २०० रु. नेमणूक आहे सभामंडप मोठा व मजबूत आहे. |
| नारोशंकर राजेबहाद्दर. | रामेश्वर व त्यापुढील पटांगण व घाट. | १७४७ ते १७७० | [ जास्त माहिती भाग ५ पहा. ] |
| खंडेराव त्र्यंबक ओंढेकर. | श्रीराममंदीर. | १७७८ ते १७९० | [ जास्त माहिती भाग ५ पहा. ] |
| मोरो आबाजी सोमण. | [ १ ] सप्तशृंगच्या देवीचा तांदळा. [ प्रतिमा. ] [ २ ] बाणेश्वर. | १८८४ | [ १ ] राजेबहाद्दर यांनीं बांधलेल्या कामाचा जीर्णोद्धार केला. [ २ ] या देवावर आलय नव्हतें. तें नवीन बांधिलें. |
| गणेश विठ्ठल किबे. | केशवमहाराजाचा मठ व रामकुंडावरील पूर्वाभिमुख धर्मशाळा. | १८४७ | केशवमहाराज हे प्रसिद्ध साधु इ. स. १८४६ त समाधिस्त झाले. |
| गणेश रघुनाथ मुळे. | मैत्रायण्यांचें श्रीराममंदीर. | १८६५ | या मंदिराचें सर्व काम लांकडी असून सर्व जमीन संगमरवरी पाषाणमय आहे. येथें चौघडा असून श्रीरामाच्या |

| बांधणाराचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
|---|---|---|---|
| | | | पूजा, नैवेद्य, उत्सवासंबंधीं होणाऱ्या खर्चाच्या मानानें प्रतिसाल ३५१ रु. उत्पन्नाचा आपला जहागिरीचा अर्धा शिवनई गांव व कांहीं इनाम जमीन असें देवाच्या नांवें करून आपल्या पश्चात् पंचांनीं व्यवस्था करावी. अशी तजवीज करून ठेविली आहे. मूर्तिपुढें भिकाजी भानजी मुठे यांची समाधी आहे. |
| श्रीमति गोपिकाबाईसाहेब. | कृष्णमंदीर, गंगेंतील बंगला, तास व रामकुंडावरील दक्षिणाभिमुख धर्मशाळा. | १७६८ | १ देवास सालीना २६२ रु. ची नेमणूक आहे. देऊळ लांकडी असून दुसरी कामें दगडी आहेत. या धर्मशाळेंत प्रतिवर्षी दशहारांत गंगेची मूर्ति मांडून उत्सव होतो. |
| तपास लागत नाहीं. | सीतागुंफा. | शोध नाहीं. | अनादि असून हल्लीं त्यावर दुमजली घर बांधलेलें आहे. गुंफेंत ( भुयारांत ) सकुंचित दारानें शिरून आंत उतरल्यावर श्रीराम, लक्ष्मण, सीता या तीन मूर्ति लहानशा सिंहासनावर आहेत. तेथून लहानशा प्रति भुयारांत गेल्यावर महादेवाची शाळुंका आहे. येथें पाहण्यास येणाऱ्या |

| बांधणारांचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० सं० | विशेष माहिती. |
|---|---|---|---|
| | | | माणसांस आंतील सर्व प्रकार गुंफेचा पुजारी दिवा लावून दाखवितो. त्याजबद्दल त्यास पाव आणा द्यावा लागतो. |
| नांवाचा पत्ता नाहीं. | लक्ष्मण, धनुष्य, राम, सीता, कुंडें व भोंवतालचें पटांगण. | १७६८ | रामकुंडावर तिन्हीं बाजूंस तीन धर्मशाळा असल्यामुळें त्यास विशेष शोभा आली आहे. |
| दुसरे बाजीराव पेशवे. | शंकराचार्यांचा मठ, पटांगण (भाजीबाजाराचें) घाट | १७८४ ते १८०९ | ह्या जागीं श्रीरामाचा बाग होता. ह्या मठांत रुद्रादेवाचीं दोन देवालयें आहेत. ह्यांस सालिना नेमणूक २८९ रु. आहे. इ. स. १९१६ सालीं या मठांत शंकराचार्यांची मूर्ति बसविली गेली. मूर्तिची किंमत २ हजार रुपयावर आहे. मूर्ति फारच मनोहर व पाहण्यालायक आहे. |
| श्रीसद्गुरु रामचंद्र बळवंत बीडकर. | श्रीदत्तमंदिर. | | मंदिरास ५ हजार रु. खर्च झाला. हें राममंदिराच्या पूर्वेस वरुणा नदीच्या बाजूस आहे. बीडकर महाराज यांची शिष्यशाखा बरीच आहे. यांस किमया करण्याची माहिती होती. अक्कलकोटचे महाराज हे त्यांचे गुरु होत. त्यांनीं गुरुदक्षिणा ह्मणून (किमया) रसायन यापुढें करूं नकोस |

| ंधणारांचें नांव. | काय बांधिलें तें. | इ० स० | विशेष माहिती. |
| --- | --- | --- | --- |
| | | | असें सांगितलें. तेव्हांपासून त्यांनीं पुनः केली नाहीं. शिष्यमंडळींनीं प्रयोग करून सिद्धी झाल्याचें अवलोकनांत आहे. वीडकरमहाराज पुण्यास सामाधिस्त झाले. हे —— सिद्ध पुरुष होते. |
| स्वामी आत्मानंद सरस्वती | श्रीचंद्रमौळेश्वर मंदिर. | | या मंदिरास १५ हजार रुपये खर्च आला. पैकीं १० हजार मगनलाल चुनीलाल धिव्या मुंबईकर यांनीं दिले. स्वामी हयात असून ८–८ दिवस समाधींत निमग्न असतात. |

REFBK-0001872

औषधें घेतांना आमचींच आहेत अशी खात्री करून मग घ्या.

कोणत्याही तऱ्हेची व कशीहि आंव, पोटदुखी, कसेंहि अजीर्ण, कॉलरा, संग्रहणी, विकारी परसाकडे होणें, ह्यांजवर जर खात्रीचें औषध तुह्मांस घ्यावयाचें असेल तर आमचा

# अजीर्ण कुठाररस.

फक्त एकदांच वापरून पहा. व हें औषध खात्रीचें असल्यामुळें प्रत्येक मनुष्यानें आपल्या कुटुंबांत निदान एक बाटली संग्रहीं ठेवल्यास अडचणीच्या प्रसंगीं ह्याचा अमूल्य उपयोग होईल. इतक्या उपयुक्त व संग्राह्य औषधाची किंमत फारच थोडी ह्मणजे **सात आणे** आहे. ट. ख. वेगळा.

---

## खात्रीचें औषध.

**उत्तम भूक लागणें ह्मणजे सुखाचें साधन होय!**

**भूक न लागण्याचीं अनेक कारणें आहेत,**

व ती नाहींशीं करणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. **अवघ्या ८ आण्यांत**

# पीयूषरसाची

बाटली मागवा व तो रस घ्या. ह्मणजे पचनक्रिया वाढून भूक उत्तम लागेल व मन सुप्रसन्न राहून आपणांस आराम वाटेल. तसेच खोकला, दमा व वांती तावडतोब बंद रहातील.

**ह्याखेरीज इतर रोगांवरही खात्रीचीं औषधें मिळतील.**

मुंबईचा पत्ताः—**रा. रा. मोगरे.**
गिरगांव बॅक रोड, अमृतवाडीसमोर
करमसी दामजी बिल्डिंग्ज, मुंबई.

वैद्य—**मोरेश्वर मुकुंद मोगरे.**
मु० शिरगांव, ता० माहिम,
**जि० ठाणें.**

# दत्तात्रय कृष्ण सांडू

**आर्यौषधी कारखाना,**
चेंबूर, जि. ठाणें.
टेलिफोन नंबर ९८२४.

**दुकान व कारखाना,**
ठाकुरद्वार मुंबई पो. २.
टेलिफोन नंबर २२७८.

आमचे कारखान्यांत टिकाऊ, तयार काढे, रस, आसवें, अरिष्टें, चूर्णे, गुटिका, भस्में, मात्रा, रसायनें, पाक, अवलेह, मुरंबे, तेलें, घृतें, मलमें, लेप, क्षार, सरबतें अर्क वगैरे शास्त्रोक्त औषधें तयार होतात. बाहेरगांवचे लोकांनीं औषधें मागविणें व प्रकृतिमान कळविणें तें " चेंबूर " चे पत्त्यावर कळवावें.

या कारखान्याचें औषध विक्रीचें **दुकान** मुंबई येथें ठाकुरद्वार पोष्टानजीक आहे. तेथें आमची सर्व औषधें घाऊक व किरकोळ विकत मिळतील. **दवाखाना** शेट गंगाराम क्षत्रिय यांचे वाडींत आहे. तेथें रोग्यांची परीक्षा करून जरूर तितक्या मुदतीचीं औषधें दिलीं जातात. भेटण्याची वेळ स्टँ. टा. ११ ते ६॥.

**बाळंत काढा:**—नं. १ ( फक्त दहा दिवसांत घेण्याचा ) किंमत १२ आणे.
**बाळंत काढा:**—नं. २ ( दहा दिवसानंतर घेण्याचा ) किं. १२ आणे.
**महामंजिष्ठादि काढा:**—रक्तशुद्धीवर अत्यंत उपयोगी किं. १। रुपया.
**महारास्ना काढा:**—संपूर्ण वातविकारावर अप्रतीम गुणकारी किं. १ रुपया.
**सुदर्शन काढा:**—सर्व प्रकारचे तापावर रामबाण किं. २ आणे.
**कुमारी आसव:**—नं. १ खोकला, श्वास, क्षय, गुल्म, यांवर किं. १ रुपया.
**कुमारी आसव:**—नं. २ मुलांचे सर्व प्रकारचे विकारांवर किं. १२ आणे.
**ब्राम्ही तेल:**—मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर जाग्रण व श्रम करणारांस अत्यंत उपयोगी. मो. बा. १८=. म. बा. १० आणे. ल. बा. ५ आणे.

शिवाय प्याकिंग व पोष्टेज खर्च पडेल.

सविस्तर माहितीचा क्याटलाग दोन आणे पाठवून मागवा.

**वासुदेव कृष्ण सांडू**—मालक, **द. कृ. सांडू ब्रदर्स—मुंबई**



प्रिंटर भिकाजी अनंत कुळकर्णी आयुर्वेद प्रिंटिंग प्रेस, काकडवाडी मुंबई नं. ४.